शनिवार । ३० जानेवारी १९७१ । चाळीस पैसे

# माणूस

## आभार

गतवर्षातील
सर्वोत्कृष्ट कामगिरीबद्दलचे
पारितोषिक 'माणूस'ला मिळाले.
याबद्दल आपले
हार्दिक अभिनंदन.
– सुधाकर डोईफोडे
संपादक दै. प्रजावाणी
नांदेड, ८–१–१९७१

मराठी वृत्तपत्रसृष्टीत
उत्कृष्ट कामगिरी
केल्याबद्दलचे हे पारितोषिक
मुंबईचे एक ज्येष्ठ पत्रकार
श्री. वि. स. बापट यांनी
मुंबई मराठी
पत्रकार संघाच्या वतीने
गेल्या वर्षापासून
चालू केलेले आहे.
पहिल्या वर्षी
'नवकाळ'
पत्रास
हे पारितोषिक
देण्यात आले.
यंदा
'माणूस'ची
निवड झाली.
अनेक मित्रांनी
समक्ष वा पत्राद्वारे
या गौरवाबद्दल
'माणूस'चे
अभिनंदन केले.
काही पत्रांतून
यावर स्फुटेही
प्रसिद्ध झाली.
'माणूस' परिवार
या सर्वांचा
आभारी आहे.

शनिवार, ३० जानेवारी १९७१

# माणूस

| | | |
|---|---|---|
| वर्ष : [illegible] दहावे | संपादक | सहाय्यक |
| अंक : सत्तावन्नावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |

| | | |
|---|---|---|
| किंमत | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| चाळीस पैसे | तीस रुपये | साठ रुपये |


## सप्रेम नमस्कार

□ २ जानेवारीपासून सुरू झालेली श्री. विनय कुबेर ह्यांची 'पर्ल हार्बर' ही युद्ध-कथा एकदम टॉप. पर्ल हार्बरवर आतापर्यंत बरीच पुस्तके वाचली. पण मराठीतून लिहिलेली ही लेखमाला वाचण्यात आनंद वाटतो. लेखकाने ह्या हल्ल्याचे सूक्ष्म निरीक्षण करूनच मग कहाणी लिहावयास घेतली हे वाचताना समजते.

विज्ञानेश्वरीतील 'दूरचे तारे' हा लेख मी पूर्ण वाचून काढला. माहितीपूर्ण, अभ्यासपूर्ण असा हा निश्चितच आहे. मराठीत विज्ञानावरील लेख देऊन माणस-बाबतच्या आशाआकांक्षा नक्कीच वाढल्या आहेत. अशाच प्रकारचे लेख पुढे पण द्यावेत.

१० जानेवारी, १९७१ — प्रदीप जोग, मुंबई

□ 'माझा जाहीरनामा' उपक्रम स्वागतार्ह. दत्तप्रसाद दाभोळकरांची विज्ञानेश्वरी बेस्ट. पर्ल हार्बर इंटरेस्टींग. केवळ नांदेडची हालचाल म्हणजे संपूर्ण मराठवाड्याची हालचाल होते काय ? माझ्या समजुतीप्रमाणे मराठवाडा पाच जिल्ह्यांचा आहे.

द्विसाप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणस' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

'माणूस'ची किमत तीच आहे. परंतु पृष्ठ संख्या कमी झाली. आठवड्यास ऐंशी पैसे खिशास थोडे जड जातात.

८ जानेवारी, १९७१ उत्तम शर्मा, बाळापूर

□ ता. ३० डिसेंबर १९७० च्या आपल्या अंकातील स्काउट चळवळीबद्दलचा लेख वाचला. या चळवळीसंबंधी इतक्या अर्ध्याकच्च्या व्यक्तीने लिहिलेला व इतक्या असंबद्ध, परस्परविरोधी व बिनबुडाच्या विधानांनी भरलेला लेख अद्यापपर्यंत तरी लिहिला गेलेला नसावा. "बिशप, रोझरीसारख्या शाळा अथवा 'म्युनिसिपालिटी'च्या शाळांमधून स्काऊट पथके नसतात"—इथपासून "खरी कमाईत मिळविलेले पैसे जाहीर केले जातात" यासारख्या अत्यंत चुकीच्या माहितीने भरलेला हा लेख लेखकाची कुवत सांगून जातो. "स्काउट निरर्थक असले तरी योजना चांगल्या आखल्या तर—" इ. विधाने त्याच्या डोक्यातील गोंधळ दाखवतात. स्वतःच्या स्काऊट शिक्षणाचा उल्लेख अनेक ठिकाणी करूनही पुनः स्काउटची माहिती मिळविण्यासाठी स्काऊट कचेरीत जाऊन तेथील काहीतरी कल्पित संभाषणे लिहिण्यामध्ये लेखाची रुची कशीबशी वाढवावी असाच सवंग हेतू असावा अशी शंका येते.

स्काऊट चळवळीचा पुनर्विचार व्हायला हवा याबद्दल प्रत्येकाची मते वेगवेगळी असू शकतील. परंतु स्वतःच्या अत्यंत संकुचित अनुभवांवरून सर्व चळवळीसंबंधी मत बनविणे हे बालीशपणाचे म्हटले पाहिजे. लॉर्ड बेडन पॉवेलने आराखडे घालून दिले आहेत त्याबाहेर कधी जाता येत नाही, असा आभास निर्माण करण्याचा प्रयत्न करणे हे स्वतःच्या वरवरच्या अभ्यासाचे लक्षण तर आहेच पण हा त्या गृहस्थावर व चळवळीवर एक अन्याय आहे. वननिवास, खरी कमाई यांच्यासारख्या कार्यक्रमांचे शैक्षणिक महत्त्व न ओळखणाऱ्याची कीव केली पाहिजे.

समाजाच्या वेगवेगळ्या अंगांची माहिती करून देण्याच्या आपल्या उद्देशानुसार आपण हा स्काऊट चळवळीसंबंधी लेख प्रकाशित केलात हे योग्य आहे. परंतु 'स्काऊट इंपोर्टेड असल्याने प्रथम हाकलून दिले पाहिजे' असे एकदा म्हणून पुन्हा त्याच लेखात 'स्काऊटच्या पुनर्विचारामुळे पाच लाख विद्यार्थ्यांना चांगली दिशा दाखविली जाईल' असेही म्हणणारा अजाण लेखक आपणास मिळाल्याने आपला हेतू साध्य झाला असावा असे वाटत नाही. स्काऊट-शिक्षण घेतलेल्यांना लेखामधील पोचटपणा सहज लक्षात येईल.. परंतु ते न घेतलेल्यांचा कदाचित् गैरसमज होईल. तो न व्हावा म्हणून या पत्राचा प्रपंच.

३ जानेवारी, १९७१ प. दि. सोहोनी, पुणे

# आमचे जाहीरनामे

## त्यांच्या धमन्यात – अन्यायाची चीड आहे....

**जनताराम जनार्दन**

दारातून आत जायची सगळी धडपड
धक्काबुक्की, शिवीगाळी आणि पडझड
एकदाचे आत जावे टोप्या सावरीत
उंच इमारतीतून आदेश सोडावे
आत जाताना आरडाओरडा करावा
कुणी संस्कृतीच्या पळयापंचपात्र्या
वाजवाव्या
कुणी समाजवादाचे ढोल बडवावे
'शिवाजी महाराज की जय'
'भारतमाता की जय'
'XXX ना खाली ओढा'
'मराठी पाऊल पडते पुढे'
की आमचे ऊर भरून येतात
आणि हृदयांच्या घड्या होऊन
पेटीत पडतात.

उंच इमारतीत गेल्यावर
वातानुकुलीत व्हावे, आराम घ्यावा
इमारतींच्या खिडक्या नेहमीच बंद
असतात
इमारतीशी आपलेपणा वाटावा
मग समारंभ, उद्‌घाटनं पार पाडावी
लफ्फेदार भाषणं ठोकावी
बासुंदीपुरी खाऊन
'गरीबी हटाओ'चा आक्रोश करावा
चारचौघा 'बुद्धिवंताना' गोंजारावं
की लेखण्या गोड कुरकुर करतात
जमिनी विकत घ्याव्या
(बायकांच्या नावे)
पोराबाळांना धंदे उघडून द्यावे
(की देशाची प्रगती होते)
जमल्यास थैलीशहांची मदत घ्यावी
ते शेजारच्याच इमारतीत असतात
त्यांचे हात या इमारतीपर्यंत पोचतात
मग त्यांच्याशी हस्तादोलन करावे

इमारतीबाहेर आरडाओरडा झाला
की पोलीस सोडावे
सैन्य सोडावं
संपादकांचे ताफेही

मोकळे सुटावे
म्हणजे
विद्यार्थी बेशिस्त ठरतात
कामगार देशद्रोही ठरतात
लॉ अँड ऑर्डरचा हातोडा
फुटेपर्यंत बडवावा
थैलीशहा इमारतीतून
पहात असतात

तरीही निवडणुका लढवल्याच जाव्या
(नाहीतर इमारतीत कसा प्रवेश)
लोकशाही(?)ची दारू पाजली
की लोक उत्साहाने मतं देतात
(कुणाची लोकशाही हा प्रश्न अलग आहे)
भोळ्याभाबड्या जनतेने
यातूनच समाजवादाची स्वप्नं पहावी
(समाजवादाचा अर्थ पहायला वेळ कुणाला आहे?)
प्रस्थापित अधिकच घट्ट रोवायचं
की लोकशाहीचा मुरंबा छान होतो
'लॉ अँड ऑर्डर'चं लोणचं मुरतं
आणि थैलीशहांच्या इमारतीतून
गोड गोड चुंबन मिळतं

याचसाठी का निवडणुका?
हीच का खरी लोकशाही?
याचसाठी त्यांना निवडून द्यायचं?
आपल्याभोवती आपणच
प्रस्थापिताचा फास लावून घ्यायचा?
कुठून तरी असंतोषाचे आवाज उठतात
हत्या होतात
प्रस्थापितांच्या इमारतींवर दगडफेक होते
आपणही काही कमी नसतो
न्यायासाठी पोलिसांच्या गोळ्या खातात
ते राष्ट्रद्रोही असतात – आपल्या मते
(कारण ते इमारत पाडतात ना?)
पण तेच खरे नेते आहेत
कारण त्यांच्या धमन्यात
अन्यायाची चीड आहे
त्यांना ह्या कुजक्या इमारती
पाडायच्यात!
(आत बसलेल्यांना जग दाखवायचं!)
हेच आपले नेते
त्यांनाच आपली मते हवीत
छी: थू: नको. □

## तरुण कारकुनी करू शकणार नाहीत

**गोविंद गोरे**, ठाणे

भारताच्या स्वातंत्र्योत्तर कालातील झालेल्या सर्व निवडणुकांचा आढावा घेतला असताना फक्त एवढेच आढळून आले आहे की,

संसदीय लोकशाही पद्धतीने आपल्या देशाने केलेली प्रगती नगण्य आहे. कोणत्याही क्षेत्रात आपण नेत्रपदीक अशी यशाची उंची गाठलेली नाही. परराष्ट्रीय धोरणाबाबत आपली फजिती जगजाहीर आहे. आर्थिक आघाडीवर आपली केविलवाणी माघार आहे. लष्करी खर्चासाठी मंजूर झालेल्या रकमासुद्धा आपण खर्च

न करिता तशाच वर्षानुवर्षे पडून ठेवलेल्या आहेत हे अंदाज समितीचे अहवाला-वरून कित्येक वेळा उघड झालेले आहे. कायद्याची आपण कसलीच बूज न ठेवल्यामुळे दिवसाढवळ्या माणसांचे राजरोस खून पडत आहेत. याबाबत कल-कत्त्याकडेच बोट दाखविले पाहिजे असे नसून जुलै, ऑगस्ट महिन्यात मुंबईमध्ये पडलेले खून आणि त्या आधीचे काही महिन्यात उपनगरातून झालेली हत्याकांडे व आगगाड्यातून झालेले खून याचा प्रामुख्याने उल्लेख करतो येईल. लाचलुचपत, भ्रष्टाचार याने शासन यंत्रणा संपूर्ण पोखरून काढलेली आहे. औद्योगिक आघाडी-वरील आपली पुच्छगती चालूच आहे. सरकारी भांडवलाचे कारखाने आणि कापडगिरण्यासुद्धा अतिशय तोटयात चाललेल्या आहेत. एकूण चित्रच निराशाजनक आहे. जे काही रंगवून सांगितले जाते अगर पोवाडे गायले जातात त्याचा विचार केला तरीसुद्धा आपण एक टक्कासुद्धा प्रगती केलेली नाही. राष्ट्रीय संपत्तीचा अपव्यय तर भयावह आहे.

आपण जपान, जर्मनी...पश्चिम...आणि फ्रान्स या देशांकडून कितीतरी शिकण्यासारखे आहे. रसातळाला गेलेली राष्ट्रे फिनिक्स पक्षासारखी पुन्हा गौरवाने, मानाने, आणि नेत्रदीपक यश मिळवून जगाकडे अभिमानाने पाहत आहेत. ज्या फ्रान्सने सामुदायिक बाजार पेठेचे योजनेत इंग्लंडला सहभागी होण्यास मज्जाव केला होता त्याच फ्रान्सकडे सोने खरेदी करण्यासाठी वेळप्रसंगी इंग्लंडला धाव घ्यावी लागत आहे. आपल्या देशाला चांगले दिवस पहावयाचे असतील तर याच राष्ट्रांचा आदर्श आपण डोळ्यापुढे ठेवला पाहिजे. चैतन्य, समर्थता आणि आर्थिक स्थैर्य लाभल्याशिवाय राष्ट्र कधीच मानाने जगू शकणार नाही. हे पाहिजे असेल तर मला पुढील उपाय सुचत आहेत.

१. काश्मिरपासून कन्याकुमारीपर्यंत सर्व भारतातील नागरीक हा एकच पातळी-वरील नागरीक मानला जाईल. कोणत्याही प्रकारचे भेदाभेद त्यामध्ये राहणार नाहीत. जो सामाजिक दर्जा त्याला काश्मिरमध्ये असेल तोच दर्जा कन्याकुमारीजव-ळील नागरिकासही असेल.

२. सर्व धार्मिक असे सार्वजनिक कार्यक्रम हे केवळ भारतीय नागरिकाचे घरा-पुरते आणि प्रार्थना मंदिरापुरतेच मर्यादित राहतील. त्याचे प्रदर्शन, रस्त्यावर होता कामा नये.

३. सर्व देशामध्ये सर्वांना आठ तास कामाचे राहतील. याव्यतिरिक्त त्याची विश्रांती व जेवणाची सुट्टी इ. वेळ राहील. आठ तासामध्ये या गोष्टींचा समावेश असणार नाही. आठवड्यातील कामाचे दिवस पाच आणि कामाचे तास आठ राहतील.

४. सर्व संस्थांना, कार्यालयातील कर्मचाऱ्यांना आणि भारतामध्ये काम करणाऱ्या

पृष्ठ ४९ वर

## दिल्ली वार्ता

# आकर्षक पोस्टर्स : जिप्सचे गौडबंगाल

**छोटेबाबू**

साधारणपणे नेहमी नाटक-सिनेमा-मुशायरा-किंवा व्यापारी मालाची जाहिरात करणाऱ्या पोस्टर्सऐवजी दिल्लीतील भिंती आता निवडणुकीच्या पोस्टर्सनी भरून निघाल्या आहेत.

प्रचारात नुसत्या भाषणबाजीने काही होत नाही, पोस्टर्सच जास्त प्रभावी ठरतात याचा अनुभव गेल्या वेळी मुंबईत स. का. पाटील–जॉर्ज फर्नांडिस लढतीत आला. फर्नांडिस यांच्या बाजूने पोस्टर–युद्ध अधिक शिस्तबद्ध व प्रभावी होते.

त्या वेळप्रमाणेच आताही दिल्लीत जवळजवळ रोज नवीन पोस्टर्स दिसू लागली आहेत. मुख्यत: सत्तारूढ काँग्रेस व जनसंघ यांचा जोर दिसू लागला आहे. म्हणजे एकानं काढलेल्या पोस्टरला लगेच दुसऱ्याने उत्तर म्हणून दुसरे पोस्टर काढायचे असा क्रम आहे. 'इंदिरा गांधी–भारताची एकमात्र आशा' असे पोस्टर झळकताच कम्युनिस्ट व मुस्लिम लीगच्या कुबड्या घेऊन चालणाऱ्या इंदिराबाईंच्या चित्रा-पुढे 'भारताची ही एकमेव आशा ?' असे पोस्टर जनसंघ काढतो तर 'देशभक्ती, तुझे नाव जनसंघ' याला 'जातीयवाद, तुझे नाव जनसंघ' असे उत्तर काँग्रेस देते.

एक मात्र खरं, या आधीच्या निवडणुकीपेक्षा यावेळी पोस्टर्स अधिक चांगली, आकर्षक आहेत. त्यांत वापरलेली परिणामकारक भाषा पाहून तर हे काम कसबी जाहिरात संस्थेचे असावे अशी शंका येते.

प्रसारासाठी दुसरे प्रभावी 'माध्यम' म्हणजे जीप. खेडोपाडी, दूर डोंगरात जायला यासारखे वाहन नाही.

निवडणूक होणार असे जाहीर होताच जुन्या जीपची किंमत आता एकदम तिपटीने वाढली आहे. या आधी चार हजार रुपये किंमत होती ती आता बारा हजार झाली आहे.

समाजकल्याण, कुटुंब नियोजन अशा निरुपद्रवी खात्याकडे असलेल्या जीपचा वापर सत्ताधारी पक्ष प्रचारासाठी करीत असल्याच्या आरोपांना सुरुवात तर झाली आहेच. शिवाय लष्करासाठी तयार करण्यात आलेल्या जीपही काँग्रेसने आपल्याकडे वळवून घेतल्या असे विरोधक म्हणत आहेत.

ते खरे की खोटे कुणास ठाऊक, पण दुसऱ्या एका प्रकरणाने पंतप्रधानांची नाचक्की मात्र होऊ घातली आहे.

त्याचे असे झाले, गेल्या रविवारी (१७ जानेवारी) 'स्टेट्स्मन' दैनिकाचा फोटोग्राफर येथील योग आश्रमाच्या आवारात दुरुस्ती व रंगरंगोटीसाठी ठेवलेल्या जीपच्या काफल्याचे फोटो घेण्यासाठी गेला, तेव्हा आश्रमातील काही लोकांनी त्याला विरोध केला. पंतप्रधानांचे चिरंजीव संजीव गांधी तेथे आले तेव्हा त्यांनी तर कॅमेरा हिसकावून रोल काढून घेतला !

याची पार्श्वभूमी अशी : या जीप अर्थातच सत्तारूढ काँग्रेसच्या प्रचारासाठी तयार करण्यात येत आहेत. डागडुजीसाठी आपण केवळ मदत करीत होतो, असे संजीव यांनी नंतर सांगितले.

अर्थातच आपल्या आईच्या पक्षाच्या प्रचारात लेकाने मदत करण्यास कोणीही हरकत घेणार नाही. ( आठवण झाली म्हणून लिहितो–' केवळ तो माझा मुलगा आहे या कारणावरून त्याला लहान कार बनविण्यास परवानगी देऊ नये हा त्याच्यावर अन्याय आहे '–हे उद्गार मातोश्री इंदिराजींचेच ! ) प्रश्न असा की त्याने वर्तमानपत्राच्या फोटोग्राफरला मज्जाव का करावा ? पांढऱ्या रंगात रंगविलेल्या जीपमागे काही काळेबेरे तर नाही ? आपले कोण वाकडे करणार अशा रुबाबात वृत्तपत्र प्रतिनिधींशी पंतप्रधानांच्या चिरंजीवांची अशी वागणूक ? वृत्तपत्रे माझ्या भूमिकेला न्याय देत नाहीत असे म्हणणाऱ्या इंदिराजी आता दिल्लीत परतल्यावर काय करतात ते पाहायचे.

पुढचा प्रश्न : योग आश्रम शिक्षण खात्याच्या मदतीवर चालतो. मग काँग्रेसच्या जीपचा प्रवेश कसा ? संचालक स्वामी धीरेंद्र कुमार ब्रह्मचारी म्हणतात, 'आवार एप्रिलपर्यंत भाड्याने दिले आहे. आमचा आणि जीपचा किंवा या कॅमेरा प्रकरणाचा काही संबंध नाही. '

काय गंमत आहे, हेच स्वामी त्याच दिवशी दुपारी जीप रिपेअरिंग–पेंटिंग कामावर जातीने सुपरव्हिजन करताना दिसत होते. ते असो. पण आवार भाड्याने दिले आहे, ऑफिस नाही, मग ऑफिसात जीपचे फॅन बेल्ट कसे ?

–योगासनप्रिय जवाहरलालजींची कन्या इंदिराबाई यांना स्वामी धीरेंद्र ब्रह्मचारी योगासने शिकवितात–हे केवळ माहितीसाठी.

या आधी या आश्रमाचे नाव वृत्तपत्रात झळकले एका मेक्सिकन स्त्रीमुळे.

'आपण माजी पत्रकार असल्याचे सचालकांना कळल्यानंतर आपल्या जीवाला धोका निर्माण झाला' अशी तक्रार या महिलेने पोलिसात नोंदविली होती. या आश्रमात काही 'विलक्षण दीक्षा समारंभ' (weird inititiation ceremonies) होतात, असे तिने सांगितले होते.

–तर अशा प्रकारे प्रचार सुरू झाला आहे. जुने खासदार, नव्याने तिकिट मिळालेले उमेदवार आपापल्या मतदार संघात दिसू लागले आहेत.

आता मतदार संघाच्या आसपासच सरकारी काम निघून मंत्रिमहाशयांना तिकडे जावे लागते, याला नाईलाज आहे.

निवडणूक म्हटली की अवाढव्य खर्च आलाच. साधारण एका उमेदवारामागे चार ते पाच लाख रुपये खर्च येतो. (पुण्यात अटलविहारींना तीन लाखाची थैली अर्पण करण्यात आली तेव्हा ते म्हणाले होते, 'जेमतेम एका उमेदवाराचा खर्च तर भागला!) तसे निवडणूक मंडळाच्या नियमानुसार फक्त तीस हजार रुपये खर्च करायला मुभा आहे.

म्हणजे लोकसभेच्या एकूण ५२१ जागांकरिता सर्वत्र दुरंगीच सामना झाला असे गृहीत धरले तरी ५२१ × ४ = २०८४ लाख रुपये खर्च येईल. हिमाचल प्रदेशाला स्वतंत्र दर्जा मिळाल्यानंतर लोकसभेच्या दोन जागा कमी होतील. नाहीतर अजून किमान आठ लाख रुपये खर्च वाढला असता!

यात प्रत्यक्ष मतदान वगैरेसाठी येणारा खर्च धरलेला नाही.

एवढा सगळा विचार करून, येत्या काही दिवसात भाववाढ होईल, असा अंदाज तज्ज्ञ व्यक्त करीत आहेत. कारण या भांडवलातून उत्पादन असे काहीच होत नाही.

आता प्रश्न असा आहे की एवढा पैसा उभा कसा होतो?

पहिला मार्ग : परकी सत्तेकडून किंवा संस्थांकडून प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष रीतीने. नुकत्याच पार पडलेल्या पंजाब पोटनिवडणुकीच्या प्रचारात रशियाची मदत होत होती, यासंबंधी आरडाओरडा झाला होता तर उजव्या पक्षांना अमेरिकेसारख्या देशाकडून मदत मिळते अशी बोलवा आहे. गुप्तचर विभागाने १९६७ व नंतर १९६८ मध्ये सादर केलेल्या अहवालात भारतीय पक्षांना परकी मदत मिळत असल्याचा स्पष्ट उल्लेख होता.

अशा मदतीवर नियंत्रण घालण्यासाठी पार्लमेंटपुढे बिल मांडण्याचे आश्वासन केंद्र सरकारने दिले होते. बिलाचा मसुदा तयारही तयार होता. गेल्या हिवाळी अधिवेशनात ते चर्चेसाठी यायचे, पण कुठे घोडे अडले कुणास ठाऊक.

निवडणूक निधीसाठी दुसरा मार्ग : देशातील उद्योगपती. कोणाही बड्या कारखानदाराने सत्तारूढ काँग्रेसला पैसा–निधी–नाकारलेला नाही, अशी फुशारकी एका केंद्रिय मंत्र्याने मारली आहे. याच पक्षाचे एक मुख्यमंत्री म्हणाले, "फक्त पाच टक्के उमेदवार स्वतःचा पैसा खर्च करतील. बाकीच्यांना 'कुठून तरी' मिळतोच.'

तिसरा आणि नवा मार्ग : स्मरणिका काढणे. या स्मरणिकांसाठी जाहिरात स्वीकारून विशेषत: सत्तारूढ काँग्रेस पैसे मिळवीत आहे. हा मार्ग उद्योगपतींना व व्यापाऱ्यांना अधिक सोयीचा, कारण करांच्या नियमात जाहिरातींना सवलत आहे!

पाकिस्तान आक्रमण करण्याच्या तयारीत आहे, असे जाहीर करून केंद्र सरकारने काश्मिरच्या सार्वमत आघाडीवर बंदी घातली व शेख अब्दुल्ला वगैरे नेत्यांना अडकवून ठेवले, याचा अर्थ आपल्याला पार्लमेंटमध्ये बहुमत मिळणार नाही अशी भीती इंदिरा गांधींना वाटते असे संघटना काँग्रेसचे नेते म्हणतात.

बहुमत मिळणार नाही अशी पक्की खात्री झाली की निवडणुकीच्या सुमारासच देशात आणीबाणी पुकारून निवडणूकच रद्द करण्याचा सल्ला पंतप्रधान राष्ट्रपतींना देतील असे या नेत्यांचे म्हणणे आहे.

भारतीय पक्ष व राजकारण यावरील तज्ज्ञ प्रा. मिरॉन वेनर यांच्या तर्काचा हवाला ही मंडळी देतात. सत्ताधारी काँग्रेसमध्येच आंध्र, महाराष्ट्र व राजस्थान मिळून नवी सिंडिकेट तयार होत असून इंदिराबाईंना बहुमताचा पाठिंबा मिळण्याची शक्यता कमी होत आहे असे प्रा. वेनर यांचे म्हणणे आहे.

प्रदेश काँग्रेसने एकमताने घेतलेले निर्णयही इंदिराजी आपल्या हेतूंसाठी फिरवीत आहेत. (उदा. महाराष्ट्र काँग्रेसने केलेली यादी) त्यामुळे त्यांच्याविरुद्ध असंतोष माजत आहे, असे संघटना काँग्रेसच्या गोटातून बोलले जाते.

गांधी सरकार अल्पमतात असल्याने आणीबाणी पुकारण्याचा सल्ला राष्ट्रपती गिरींनी मानावा की नाही हा प्रश्न पुन: येईलच.. असा सल्ला राष्ट्रपतींवर बंधन-कारक नाही असे घटनेत म्हटले आहे. पण आतापर्यंतचे अनुभव लक्षात घेता गिरी याही निर्णयावर सही करण्याची शक्यता आहे.

◻ ◻ ◻

थोडे विषयांतर : फॅशनच्या वेगाला 'कॅच' करण्यासाठी येथील तरुण-तरुणी जुन्या पँटच्या शिलाईवर फाडून तेथे दुसरे किंवा तेच कापड शिवत आहेत त्यातून तयार होते–बेल बॉटम.

फॅशनसंबंधीचा एक विनोद वाचला : "काय हल्लीचे कपडे तरी, मुलगा आहे की मुलगी हे ओळखतासुद्धा येत नाही. ते पहा ना, त्या मुलाने कसे कपडे घातले आहेत–"

"मिस्टर, तो मुलगा नाही, मुलगी आहे माझी–"

"सॉरी हं. तुम्ही त्याचे वडील असाल असे वाटले नाही."

"ऐ, मी वडील नाही, आई आहे तिची!"

# सुरिंदर शर्मा, दाभोळात

१६ जानेवारी १९७१

पंजाबी ढंगाने चापचोपून बसवलेले डोक्याला एक अलवणी पागोटे, इन्शर्ट न केलेला एक लांबसडक शर्ट आणि त्याखाली नॅरोबॉटमची पँट, पायात पायमोजे आणि त्यावर चढवलेले सँडल्स अशा वेषात सुरिंदर शर्मा आमच्या दाभोळच्या शाळेत येतात. त्यांच्या पंजाबी उंचीने व अफलातून ड्रेसमुळे पोरांचे गाणे घोगरे होते. त्यांचे थोडेसे घारे पण विशाल नेत्र आजूबाजूची सृष्टी टिपीत असतात. मग औपचारीक ओळखीचे सोपस्कार पार पडल्यानंतर सुरिंदर शर्मा या नावाचा शीख, पंजाबी 'माणूस' ६४०० मैल अंतर आपल्या 'सखीला' घेऊन दाभोळला येत आहे हे वृत्त सगळ्यांनाच भारून टाकते. बीन दाढीचा माणूस 'सरदारजी' असू शकतो यावर सरावाने विश्वास बसू लागतो.

सुरिंदर शर्मा हे मूळचे पश्चिम पंजाबातले. आता ती धरती भारतीय राहिली नाही. एकोणीसशे चौतीस साली जन्माला आलेल्या या पोराने 'बटवाँरा' होईपर्यंत आपले जीवन लाहोरलाच घालविले. तोपर्यंत ते बडे बापके बेटे होते. पण स्वातंत्र्याच्या प्रभात काळात एका सायंकाळी क्रिकेट खेळून आल्यावर अंगावरच्या वस्त्रानिशी त्यांनी मातृभूमीला रामराम केला. त्या फाळणीच्या दिवसात अनेक निरपराधी जीवांनी ज्या वेदना, मानहानी, अपमान आणि उपहास यांना तोंड दिले तेच 'विधीलिखीत' शर्मा कुटुंबाच्या भाळी आले. शर्माजी जेव्हा त्या जहरी दिवसांची 'याद' सांगतात तेव्हा ऐकणारांच्या मनातदेखील ठिणग्या उडू लागतात.

त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण पंजाब कृषी विद्यापीठाच्या लुधियाना महाविद्यालयात पार पाडले. एम्. एस्सी. ची पदवी घेऊन ते आता महाराष्ट्रातील सोलापूर आणि रत्नागिरी ज़िल्ह्यातील सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करून **Ph. D.** ला प्रबंध तयार करीत आहेत. ग्रामीण भागातील कृषिजीवन व ग्रामीण माध्यमिक शिक्षण हे त्यांच्या अभ्यासाचे खास विषय आहेत.

शर्माजींची श्रद्धा आहे की, सायकल हेच वहान असे आहे की, ते नुसतेच खेड्यांना घऊन जात नाही तर शेतकऱ्यांच्या, ग्रामीण जनतेच्या अंतःकरणाला जाऊन भिडते. वस्तुनिष्ठ अभ्यासाला त्यामुळे मदत होते. स्कूटर, मोटार ही साधने फक्त 'साहेबी' माहितीची जंत्री जमा करतात. इस्रायल, जपानला जाऊन आलेला हा तरुण जेव्हा असे बोलतो तेव्हा 'चलन शुद्धीवर' भाबडा विश्वास असलेल्या आमच्यासारख्यांशी ते जवळीक साधून जातात.

महाराष्ट्रातील ग्रामीण आदरातिथ्याने, स्वागताने त्यांना चांगलेच मोहीत केले आहे. ते घाट उतरून कोकणात आल्यापासून इथला साधेपणा, स्वच्छता आणि कोकणी 'आग्रह' या विषयांवर दिवसातून दोन चार वेळा तरी बोलत असतात. कोकणच्या सामर्थ्यशाली निसर्गाचे वर्णन करणे त्यांना अशक्य होते. ते म्हणतात, 'It is to be Seen'.

शर्मा यांच्या सायकल भ्रमंतीतील हे एक टिपण—

**— रतनलाल भंडारी, दाभोळ**

---

# सफदरजंग मार्ग, बंगला क्रमांक १....

सकाळची वेळ आहे. मंद वारा वाहतोय. आजूबाजूला सर्वत्र उत्साह भरून राहिलाय. खूप गर्दी जमली आहे. तिथं युवक-युवती आहेत. काहींच्या हातात पुष्पहार आहेत. काहींच्या कॅमेऱ्याची 'क्लिक्' चालू आहे. इंद्रधनुष्यी रंगांच्या साड्या-सलवार कमीजांची अन् त्यांच्या मालकिणींची उत्सुकता वाढलीय. तरुण साथी 'गुडबाय' म्हणताहेत. जवानी, उत्साह अन् आकांक्षाचं एक रूप पालटतंय. अन् हो! ७–३० झालेत. आता तर घटका भरून चाललीय. ब्राह्म मुहूर्तावर प्रस्थान केलंय. दिवस १३ एप्रिल. वैशाखी. आम्हा पंजाबच्या लोकांचा मोठा सण. एका विशिष्ट ध्येयानं, साहस करून, आव्हान दिलं गेलंय. कुठं जायचं, कसं जायचं, खाना कुठं घ्यायचा, झोपायचं कुठं, सारं सारं ठरलंय, योजलंय. नि मग निघालो. एक सूटकेस. त्यात जरूरी कपडे, पुस्तकं, किरकोळ औषधं, बिस्तरा अन् लेखन-साहित्य. दूर दूरच्या प्रवासाला.

हजार मैल दूरची ही मुशाफरी. आज्ञाताची ओढ नि माणसांचा अभ्यास. नुसताच आकडेमोडीचा अभ्यास नाही तर त्यांच्यात रहायचंय, बोलायचंय. त्यांची भाषा शिकायची, पाह्यची. संतांची-वीरांची भूमी. पराक्रमी पुरुषांची जननी. बुद्धि-श्रेष्ठांची खाण. दगडाधोंड्यांची जमीन. अगदी सह्याद्रीचा कातळ. त्याची ओढ लागलीय. ती भूमी पुकारतेय, बोलावतेय. अन् म्हणूनच मी निघालोय. सख्या-सोबत्यांच्या शुभेच्छा, थोरामोठ्यांचे आशीर्वाद, हितचिंतकांचं प्रेम, सुहृदांची माया, सब कुछ साथ है.

दिल्ली! भारताची राजधानी. प्रचंड शहर. अगदी पुराण्या काळापासूनचं.

केवढी साम्राज्यं झाली. किती पराक्रमी पुरुष इथं आपल्या वैभवाची, विलासतची अन् कीर्तीची खूण ठेवून गेले. हजारो माणसं येतात-जातात. गरीबांपासून श्रीमंतांपर्यंत, खलबतं होतात. विचार होतो. राजकारणातील प्यादी, सोंगटी सरकवतात. अन् त्यातूनच देशाचा कारभार चालतो.

अशीच एक सकाळ उजाडते. सफदरजंग रोडवरचा क्र. १ चा बंगला. सकाळचे ९–३० झालेत. एका साधारण बंगल्याजवळ माझी ही सखी उभी आहे एका बाजूला. बरोबर आहेत एक भलेमोठ्ठे सरकारी. अधिकारी बंगल्यावर अगदी पुरेपूर बंदोबस्त आहे. कारण तिथं कसलीतरी निदर्शने आहेत. बाकी त्या बंगल्याला ही निदर्शने पाह्यची आता संवय झालीय. जसजशी भेटीची वेळ जवळ येते तसतशी धुगधुग वाढतेय. ठोके जोरात पडताहेत. क्षणभर बावरतो मी. तेवढ्यात एक शुभ्र पोषाखातला एक अधिकारी येतो नि मला घेऊन जातो आत. पावलं क्षणभर घुटमळतात. हो. बोलायचं काय, कसं बोलायचं, सुरुवात कशी करायची? शब्द जुळवत असतो मी. अन् तेवढ्यात चौक्या-पहारे ओलांडत एका खोलीशी पोहोचलो.

सर्वत्र शांतता आहे. आतून फोनची घंटी वाजतीय. दारावर एक फुलाफुलांचा पडदा आहे. १०–५ झालेत. दुसराच एक शुभ्रवस्त्री येतो. दरवाजा खुलला अन् आत शिरलो. हो! समोर टेबलाशी बसल्या होत्या–

–प्रियदर्शिनी! सफेत साडी नि उत्साही चेहरा. आगतस्वागत झालं. केशरी दुधाचा पेला आला नि त्यांचा पहिलाच प्रश्न, 'मैं आपकी क्या सेवा कर सकती हूँ?' छे! सेवा करण्याइतका मी मोठा कुठाय? एक प्रवासी-पथिक. पण तिथं सौजन्य, विनय, सुसंस्कृतता होती. १५ मिनिटं कशी गेली कळलंसुद्धा नाही. ते प्रभावी व्यक्तिमत्त्व नि ती छाप विसरणं शक्य नाही. वेळ संपला. सेवक येतो नि मला घेऊन जातो. वर बक्षिसी रु. १५१ अन् तीही कोणाकडून–

–भारताच्या प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधींकडून! केवढं भाग्य माझं हे!!

मुक्कामावर आलोय. जेवून निघालोय.

लोकसभा सदन. कारभार चाललाय तिथून आपला. ११॥ झालेत. एकामागून एक गाड्या येताहेत. पोलिस भोंग्यातून रहदारी नियंत्रण करतोय. सर्वत्र गडबड-गर्दी आहे. पोलिस आणि सुरक्षा अधिकाऱ्यांचे हात दुखताहेत सलाम करून. मंत्री, उपमंत्री, वरिष्ठ अधिकारी येताहेत. प्रतिक्षालयात तुफान गर्दी झालीय. मिळणारे आणि मिळवणारे. दोन्हीही पण. तेवढ्या त्या गर्दीतून प्रतिनिधींची ये-जा चाललीय. आत सभागृहात कसल्यातरी बिलासंबंधी चर्चा चालू आहे. मी आपल्या सखीबरोबर ती सारी गडबड, मजा पहातोय. कुणी कुणाला भेटतंय. खाण्यापिण्याचा आग्रह करतंय. प्रेक्षक गॅलरीत जाणाऱ्यांची नुसती धांदल उडालीय. त्यात वृद्ध आहेत. तरुण आहेत अन् अगदी लगीनघाईत असणाऱ्या नव्या साड्या नेसून आलेल्या ललना आहेत. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आतुरता आहे. उत्सुकता आहे.

लोकसभा भवन कसं आहे. काम कसं चालतं. सुरक्षा अधिकारी प्रत्येकाचा पास पाहतात नि त्यास आत सोडतात. एवढ्यात–

–एक साधारणसा माणूस येतो. तेजस्वी मुद्रा पण किरकोळ शरीर आहे. साधेच कपडे. माझ्या हातात 'व्हिजीटर्स कार्ड' ठेवतो. मी मोठ्या विस्मयतेनं नि आदरानं पाहत राहतो त्यांच्याकडं. पण तेवढ्यात तो गृहस्थ तेथून अदृश्य होतो. केवढ्या मोठ्या माणसानं पास दिलाय ह्या, नावच सांगू ? बॅ. नाथ पै.

आत गेलो. पाह्यलं कामकाज कसं चालतं ते. दोन तास राहिलो. बाहेर आलो. मी सखीबरोबर निघालो. रस्ता जवळचा आहे. सभागृहात चर्चा चालली होती. मोठ्या जोरजोरात लोक बोलत होते. २५०–३०० सदस्य, टोपीधारी, बोडके, धोतरवाले, पँटवाले, लुंगीत. कुणी हिंदीत बोलतंय. कुणी इंग्रजीमधून. मधूनच सभागृहाच्या अध्यक्षांची घंटा वाजतेय 'ऑर्डर, ऑर्डर.' सरकारी पक्षातले मख्ख चेहऱ्याचे मंत्री बसलेत. समोर विरोधी पक्षवाले. सफाई सर्वत्र. एवढ्यात बाजूचा दरवाजा खुलला अन् मोठ्या दिमाखानं, ऐटीत पावलं टाकीत आपल्या जागेवर येऊन बसल्या प्रधानमंत्री.

सभागृहात शांतता पसरली. सदस्य कुजबुजतात. त्या बिलासंबंधी पुढं चर्चा सुरूच होते. एक सदस्य बडे जोरजोरात भांडताहेत. त्यांच्या पक्षातले मित्र त्यांना आवरतात. सावरतात. पण नाही, त्यांचं बोलणं आपलं सुरूच. अध्यक्ष घंटी बडवतात. छे! कशाचाच उपयोग नाही. कोण आहे बरं हे ? राम अवतार शास्त्री. कम्युनिस्ट सभासद.

अन् मग मीही काही ओळखीचे चेहरे आहेत का पाहू लागलो. नजरेत भरले ते अटलविहारी पहिल्याच रांगेत. शेजारी मनोहरलाल-सोंधी. बाजूला चष्म्यातून पाहणारे मोरारजी, बाजूला रामसुभग सिंह, मागे किरकोळ शरीराचे पुण्यातले एस्. एम्., जॉर्ज फर्नांडिस, लुंगीतले कामराज, पलीकडे आहेत मधु लिमये, शेजारी बॅ. नाथ पै, अन् दिसताहेत तारकेश्वरी राणी. समोर सरकारी पक्षात दिसताहेत धीरगंभीर यशवंतराव, फेटेवाले स्वर्णसिंग, के. के. शहा, इंदिराजी, अन् काश्मीरी सुंदर युवराज करणसिंह. त्यांच्या पलीकडे दूर दिसताहेत वयोवृद्ध कृपलानी.

किती अतिरथी महारथी होते ते. आपल्या वाक्पटुत्वाने, मुद्देसूद बोलणारे, मुत्सद्दी, सरकारपक्षाचे वाभाडे काढण्यात पटाईत विरोधी पक्षवाले, अन् सरकारपक्षाचे कारस्थानी, खलबती. पाहिलं नि दोन तासात बाहेर आलो.

केवढी कारस्थानं होतात, यात काय शिजतंय पत्ता नाही आपल्यासारख्यांना, एवढ्या मोठ्या खंडप्राय देशाचा कारभार चालतोय इथून, त्या मानानं आपण छोटे, खुजे, सामान्य.

संध्याकाळी भटकलो, मनसोक्त, मनमुराद. कॅनॉट प्लेसमध्ये. फॅशनचं केंद्र, अगदी 'डबल डेकर' केशरचनेपासून मिनीस्कर्टपर्यंत. छे! छे!! मायक्रो मिनीस्कर्ट!!!

चेहऱ्यावर भरपूर रंगरंगोटी केलेल्या नयनाक्षी, हरिणाक्षी भेटतील इथं. साड्या सापडतील, अगदी खांद्यावरचा ढळणारा पदरसुद्धा. तंग सलवार-कमीज, लुंग्या-गुरु-कुडतं इतकंच काय पण पँटशर्ट घातलेल्या तरुणी,. सफरचंदी गाल नि पिकलेल्या तोंडल्यासारखे ओठ पाहून फसाल हं ! कारण ती रूज लिपस्टिकची किमया आहे. स्कर्ट तर आता मायक्रो मिनीस्कर्ट झालाय. सिनेमा पाहतात लोक. हसतात. खिदळतात. भटकतात. रस्त्यावरच्या ठेल्यातून रबडी-चाट खातात. अगदी इंद्रधनुष्याचे रंगच पहाना इथं संध्याकाळी, दिल्लीचा दिवस उजाडतो संध्याकाळी. फॅशन्सच्या परेड पाहायला मिळतात करोलबाग, दर्यागंज, कॅनॉटप्लेस, चांदणी चौक.

रेसकोर्स रोड बंगला क्र. ११. सकाळचे १०॥ वाजताहेत. भेटायला आलोय एका मराठ्या गड्याला, अगदी खास ' मऱ्हाटी. ' इथंही अगदी चौक्या-पहाऱ्यातनं जावं लागलं. अर्ध्या तासानं भेट घडली. १५।२० मिनिटं वेळ दिला होता. पण... पण पुरा १॥ तास झाला. अन् नंतर खास मऱ्हाटी जेवण आलं. ते जेवून पोटाची अन् मनाची भूकच संपली. खूप खाद्य मिळालं होतं. एवढ्यात मराठी विद्यार्थ्यांच्या एका तुकडीनं त्या बंगल्यावर धावा केला अन् भेटीची वेळ संपली असं सांगणारा निरोप्या आला. हाय ! तो सहवास संपला. मराठी मुलुखात काय पाहावं, कुठं जावं ही खास माहिती मिळाली. मराठी माणसांतल्या, ' माणसाचं, ' एका मराठी मनाचं हे रूप पाहून, अन् तेही इतक्या मोठ्या जागेवरचं, मी थक्क झालो, कृतकृत्य झालो, धन्य जाहलो. नि कोण होतं म्हणून सांगू ?

मराठी माणसाचे दिल्ली दरबारचे प्रतिनिधी, सातारी रूप ना. यशवन्तराव !

सायंकाळी गेलो होतो जेवायला एका कोकणी माणसाकडे. भलताच मनुष्यप्रेमी, जेवणावर खूप खाद्य मिळालं होतं तिथं. किती बोलू नि किती नको असं झालं तिथं. मोठ्या उमद्या मनाचा गृहस्थ! बिहार जिंकलेले मधूजी !

दुसऱ्या दिवशी भेटतात मा. लाला हंसराज गुप्ताजी. खानदानी अन् सौजन्यमूर्ति. अन् बलराज मधोकना कसं विसरू ?

सकाळी निघालो पुढच्या मंझिलीला. नवी भाषा, नवा मुलूख. उत्सुकता, ओढ नि हुरहूर.

दिल्लीच्या त्या वस्तूतील हे स्वागत, प्रेम नि अनुभव मनाच्या कोपऱ्यात साठवीत चाललो होतो मी. रस्ता कसा छान आहे. रुंद आहे. वातावरण मोठं प्रसन्न आहे. काही वेळानं आलं एक छोटंसं गाव कोसी कलान. जेवलो थोडंसं. आराम केला नि निघालो. रस्त्यात तीन तरुण नि तरुणी भेटल्या. कुठं निघालीत, कुठली नि केव्हा ? परिचय झाला. परदेशी, भाषेची अडचण, पण मनोगत हेरलंय. समजलोय. भाषेच्या भिंती निखळून पडल्यात. मनाचे धागे जुळलेत. मी मार्गस्थ झालो. तेही भटकताहेत. मी पण. ते लोक. अंतर थोडंच उरलंय. दिवस थोडा राहिलाय.

पृष्ठ ४८ वर

निवडणूक : मतप्रवाह :

# हरिजनांच्या मतांचा कल

**वा. दा. रानडे**

लोकसभेत हरिजनांसाठी ७७ व आदिवासींसाठी ३७ अशा एकूण ११४ राखीव जागा आहेत. हुकमी बहुमत मिळविण्याच्या दृष्टीने या दोन्ही गटांचा पाठिंबा मिळविण्याला महत्त्व आहे. १९६७ च्या निवडणुकीत या राखीव मतदारसंघात मतदान कसे झाले, कोणत्या राजकीय पक्षांचा विशेष प्रभाव दिसून आला, याचे विश्लेषण येत्या निवडणुकांच्या दृष्टीनेही महत्त्वाचे ठरेल.

हरिजनांसाठी असलेल्या ७७ राखीव जागांपैकी सर्वात जास्त ४७ जागा काँग्रेसने जिंकल्या. इतर पक्षांना काँग्रेसच्या मानाने फारच कमी हरिजन जागा मिळाल्या. पक्षवार त्यांची विभागणी याप्रमाणे : द्रवीड मुन्नेत्र कळघम ६, जनसंघ ५, संयुक्त समाजवादी ३, स्वतंत्र पक्ष २, मार्क्सवादी कम्युनिस्ट २, उजवे कम्युनिस्ट २, प्रजा-समाजवादी १, रिपब्लिकन १, पुरोगामी गट १, बंगला काँग्रेस १ आणि अपक्ष ?.

काँग्रेसला मिळालेल्या विजयाचा अधिक तपशीलवार विचार केला तर असे दिसेल की काँग्रेसने ओरिसा आणि केरळ सोडून बाकी सर्व राज्यात जागा मिळविल्या. आंध्र, आसाम, महाराष्ट्र, म्हैसूर या चार राज्यात काँग्रेसने सर्व हरिजन जागा जिंकून शंभर टक्के यश मिळविले. त्याखालोखाल यश उत्तरप्रदेशात १८ पैकी १४ व बिहारमध्ये ५ पैकी ४ जागा जिंकून मिळविले. राजस्थानात ३ पैकी २, मध्यप्रदेशात ५ पैकी ३ आणि गुजरात, हरियाना व केंद्रप्रदेशात प्रत्येकी २ पैकी १ जागा काँग्रेसने जिंकली. पश्चिम बंगालमध्ये ८ पैकी ३ व तामिळनाडूमध्ये ७ पैकी अवघी एक जागा त्या पक्षास मिळाली. यावरून ओरिसा व केरळ या राज्यांत हरिजनांवर काँग्रेसचा प्रभाव मुळीच नाही. तामिळनाडू व पश्चिम बंगालमध्ये तो फार कमी आहे आणि गुजरात, हरियाना व केंद्रप्रदेशात तो पन्नास टक्के आहे असे

दिसते. या भागात विरोधी पक्षांनी आपले लक्ष केंद्रित केल्यास त्यांना अधिक जागा मिळण्याचा संभव आहे.

रिपब्लिकन पक्ष हा वास्तविक हरिजन व नवबौद्धांचा पक्ष. पण १९६७ मध्ये त्याला फक्त एक जागा मिळाली. डॉ. आंबेडकर यांच्या शेड्यूल्ड कास्टस फेडरेशन-चेच रूपांतर त्यांच्या इच्छेनुसार त्यांच्या निधनानंतर रिपब्लिकन पक्षात झाले. शे. का. फे. ने १९५२ च्या निवडणुकीत ३५ जागा लढविल्या व २ जिकल्या. १९५७ मध्ये २३ जागा लढविल्या आणि ६ जिंकल्या. रिपब्लिकन पक्षाने १९६२ मध्ये ६८ उमेदवार उभे केले, त्यांपैकी फक्त ३ विजयी झाले आणि १९६७ मध्ये ७२ उमेद-वारांपैकी फक्त एक निवडून आला. रिपब्लिकन पक्षाला १९६२ मध्ये २·८३ टक्के व १९६७ मध्ये २·५० टक्के मते मिळाली. पक्षाच्या मतांमध्ये गेल्या दोन निवड-णुकांत फारसा फरक पडलेला नाही पण जागा मात्र कमी मिळाल्या. याचे कारण पक्षातील फूट.

लोकसभा निवडणुकीत १९६७ मध्ये एकूण ७७ हरिजन जागांपैकी फक्त ९ जागांसाठी सरळ सामने झाले. त्यांपैकी ३ जागा काँग्रेसने, ३ द्रवीड मुन्नेत्र कळघमने व प्रजासमाजवादी पक्ष, स्वतंत्र पक्ष आणि जनसंघ यांनी प्रत्येकी एक जागा जिंकली. सरळ सामन्यात काँग्रेसने फक्त एक तृतीयांश जागा मिळविल्या तेव्हा हरिजन जागांसाठी सरळ सामने येत्या निवडणुकीत जेवढे अधिक होतील तेवढे अधिक यश विरोधी पक्षांना मिळण्याची शक्यता आहे. पंढरपूरची जागा रिपब्लिकन पक्षाने गेल्या निवडणुकीत सरळ सामन्यात अवघ्या १०७९ मतांनी गमावली.

मतदान कमी झाले की काँग्रेसचा विजय होतो हा अनुभव हरिजन जागांच्या बाबतीतही १९६७ साली आला. एकूण ७७ पैकी १३ मतदारसंघात ५० टक्क्यां-पेक्षा कमी मतदान झाले. त्यांपैकी दहा जागा काँग्रेसने जिंकल्या व बाकीच्या तीन-पैकी दोन संयुक्त समाजवादी पक्षाने आणि एक स्वतंत्र पक्षाने मिळविली. फक्त १३ मतदारसंघात ५० टक्क्यांपेक्षा कमी मतदान झाले. यावरून हरिजनांमध्ये मत-दानाच्या हक्काबाबत जागृती वाढत आहे. तामिळनाडूमध्ये तर हरिजन मतदारसंघात सर्वत्र ७५ टक्क्यांपेक्षा कमी म्हणजे ४५·२९ टक्के मतदान १९६७ मध्ये झाले होते. या वेळी तेथे कमी मतदान होणार नाही याची दक्षता राजकीय कार्यकर्त्यांनी—विशेषतः विरोधी पक्षांच्या कार्यकर्त्यांनी—घेतली पाहिजे. कारण मतदान कमी होणे काँग्रेसला फायद्याचे कसे पडते हे मी वर दर्शविलेच आहे.

हरिजन जागांच्या बाबतीत दिसून येणारा आणखी एक विशेष म्हणजे ७७ पैकी ४६ मतदारसंघात विजयी उमेदवार ५० टक्क्यांपेक्षा कमी मते पडून विजयी झालेले आहेत. या ४६ मध्ये ३३ काँग्रेस पक्षाचे आहेत म्हणजे एकूण ७७ हरिजन जागांपैकी काँग्रेसने ४७ जागा जिंकल्या व त्यापैकी ३३ जागा ५० टक्क्यांपेक्षा कमी मतांनी जिंकल्या आहेत. एकेका जागेसाठी दोनपेक्षा अधिक उमेदवारात सामने

होऊन विरोधी पक्षांची मते विभागली गेली व त्याचा फायदा कॉंग्रेसला मिळाला हे उघड आहे. पन्नास टक्क्यापेक्षा कमी मते मिळून विजयी झालेल्या उमेदवारांची राज्यवार संख्या पाहिली तर उत्तर प्रदेशात ती सर्वात जास्त असल्याचे दिसून येते. तेथे हरिजनांसाठी १८ जागा आहेत आणि या सर्व मतदार संघात विजयी उमेदवारांना ५० टक्क्यापेक्षा कमी मते मिळाली. त्यात कॉंग्रेसचे १४ आहेत. अशाप्रकारे ५० टक्क्यापेक्षा कमी मते मिळवून विजयी झालेल्या इतर राज्यातील उमेदवारांची संख्या पुढीलप्रमाणे. आंध्र ४, बिहार ३, गुजरात २, हरियाना १, मध्यप्रदेश ३, तामिळनाडू १, म्हैसूर ३, पंजाब १, राजस्थान २, पश्चिम बंगाल ५ आणि केंद्रप्रदेश १. महाराष्ट्र, ओरिसा व केरळमध्ये मात्र एकही उमेदवार ५० टक्क्यापेक्षा कमी मते मिळवून निवडून आलेला नाही. विरोधी पक्षांचे १३ उमेदवार ५० टक्क्यांपेक्षा कमी मते पडून विजयी झाले. त्यात संयुक्त समाजवादी पक्षाचे ३, जनसंघाचे ३, स्वतंत्र पक्ष २, रिपब्लिकन १, उजवा कम्युनिस्ट १ आणि अपक्ष ३ अशी विभागणी आहे.

हरिजनांच्या ७७ जागांसाठी फक्त २६ जागांवर उमेदवार ५० टक्क्यापेक्षा अधिक मते मिळवून विजयी झाले. त्यात कॉंग्रेसचे फक्त १२ व विरोधी पक्षाचे १४ आहेत. त्यांची विभागणी पुढीलप्रमाणे. द्रवीड मुन्नेत्र कळघम ६, मार्क्सवादी २, जनसंघ २, प्रजासमाजवादी पक्ष १, पुरोगामी गट १, बंगला कॉंग्रेस १, व उजवा कम्युनिस्ट १. महाराष्ट्रात खामगाव, लातूर व पंढरपूर या तिन्ही जागा कॉंग्रेस उमेदवारांनी ५० टक्क्यापेक्षा अधिक मते मिळवून जिंकल्या. मद्रासमध्ये द्रवीड मुन्नेत्र कळघमने ६ जागा जिंकल्या. त्या सर्व ५० टक्क्यापेक्षा अधिक मते मिळवून जिंकलेल्या आहेत.

हरिजन मतदार संघातील मतदानाचा आणखी एका दृष्टीने विचार करण्यास हवा. तो म्हणजे बाद मतांचे प्रमाण. हरिजन हा मागासलेला वर्ग. त्यांच्यात बाद मतांचे प्रमाण जास्त असणार अशी कोणी कल्पना केली तर ती मात्र वस्तुस्थितीला धरून नाही. सबंध देशात सर्वसाधारण मतदारसंघात ४·४० टक्के मते बाद झाली व हरिजन मतदारसंघात ४·३९ टक्के म्हणजे जवळजवळ तेवढीच मते बाद झाली. महाराष्ट्र व आसाममधील मतदानात १९६७ च्या निवडणुकीत एक विशेष दिसून आला. तो असा की सर्वसाधारण मतदारसंघातील बाद मतांपेक्षाही हरिजन मतदार संघातील बाद मतांचे प्रमाण या दोन राज्यात कमी होते. याचा अर्थ मतदान कसे करावे याची माहिती या दोन राज्यात सर्व साधारण मतदारांपेक्षाही हरिजनांना अधिक चांगली आहे.

आदिवासी मतदार संघातील मतदानांचे विश्लेषण पुढील अंकी करण्यात येईल.

□ □ □

# हे कलकत्ता

सौ. तारा पंडित

## हे शूरवीर

एकदा एक प्रचंड मिरवणूक निघाली. केवढी तरी लांबलचक! आवेशपूर्ण घोषवाक्य फेकीत नि हवेत हात मारीत दुहेरी रांग पुढेपुढे सरकत होती. धरमतल्ल्यापर्यंत येत नाही तोच एक मोठ्ठा आवाज ऐकू आला. रांग तुटली. लोक सैरावैरा पळू लागले. आश्रयाची जागा शोधू लागले. रस्ता ओस पडला. असाच काही वेळ गेला. सगळे एकमेकांना विचारू लागले – 'काय झालं हो, काय झालं?' कुणीतरी म्हटलं – 'लॉरीचं टायर फुटलं!'

हे ऐकून सर्वांच्या जीवात जीव आला. मग ते सगळे शूरवीर एकत्र आले. पुन्हा रांग तयार झाली. पुन्हा आवेशपूर्ण घोषवाक्यांचे उच्चार निनादले...पुन्हा हवेत हात मारणे सुरू झाले...

## एक अभिप्राय

जमशेटपूरहून एक प्रतिष्ठित पाहुणी कलकत्त्याला आपल्या मैत्रिणीकडे आली असताना त्या दोघी एकदा न्यू मार्केटची फेरी करण्यासाठी बाहेर पडल्या. जाता जाता एका रस्त्यावर ट्राफिक जाम झालेला आढळला. यांचीही गाडी अर्थातच उभी राहिली. पाहुण्याबाई निरीक्षण करू लागल्या. रस्त्याच्या अगदी मधोमध एक भलीमोठी लॉरी उभी असल्यामुळे जाणाऱ्या व येणाऱ्या गाड्यांची गैरसोय होत असलेली त्यांना दिसून आली. आपल्या जागी बसल्याबसल्याच डोकं गाडीच्या बाहेर काढून, त्या लॉरी ड्रायव्हरच्या अंगावर खेकसल्या–

'...तुझ्या बापाचा रस्ता आहे होय?...'

लॉरी ड्रायव्हरने काय म्हणावं? तो काहीतरी खरमरीत उत्तर देईल ही सर्वसाधारण अपेक्षा. पण तसं काहीच झालं नाही. त्याने एकवार बाईंना न्याहाळलं नि मुकाट्याने आपली लॉरी रस्त्याच्या एका कडेला नेऊन उभी केली.

बाई जमशेटपूरला परतल्या तेव्हा सर्वांना सांगत सुटल्या – 'काय हे कलकत्त्याचे लोक भित्रे आहेत! म्हणूनच तर नक्षलवादी माजले आहेत. जरा कोणी

त्यांना खडसावून बोललं तर लागलीच होतील सरळ. आता माझे हिंदी तेवढं चांगलं नाही म्हणून, नाहीतर मीच हे काम केलं असतं !'

## एक मत हेही !

ओरिसाचे एक वेळचे मुख्यमंत्री व आताचे सर्वोदयी कार्यकर्ते श्री. नबकृष्ण चौधरी म्हणतात–

नक्षलवादी तरुणांना मी दोष देत नाही. तुमच्या-आमच्या सारखेच तेही देश-प्रेमाने पछाडलेले आहेत. फक्त त्यांची पद्धती ' निराळी ' आहे, एवढेच !

' काही सर्वोदयवादी नक्षलवाद्यांना मिळालेले आहेत. ' ह्या तेथील मुख्य-मंत्र्यांच्या आरोपाला उत्तर देताना नवबाबू बोलत होते.

ते काहीही असो. बंगालमधील नक्षलवादी तरुणांना मात्र नवबाबूंच्या ह्या विधानामुळे बरे वाटले असेल खास !

## सरकारी निर्णय !

पश्चिम बंग सरकारने कैद्यांच्या बाबतीत एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. नक्षलवादी कैदी इतर कैद्यांपासून दूर हलविले जाणार. त्यामुळे दोन हेतू साधणार आहेत. एक तर ह्या नक्षलवादी कैद्यांच्या संसर्गाने इतर कैदीही नक्षलवादी बनण्याचा धोका टळेल आणि दुसरे म्हणजे दूर ठेवलेल्या ' अशा ' कैद्यांमध्ये काहींना खास सवलती देऊन त्यांच्यात फूट पाडण्याचा प्रयत्न करता येईल.

ह्यात सरकार कितपत यशस्वी होते ते बघायचे. तूर्त तरी हे नक्षलवादी आपणाला राजकीय कैदी म्हणून संबोधले जावे असा हेका धरून त्यासाठी उपवास करीत आहेत. सध्या ' अंडर ट्रायल ' म्हणून त्या सर्वांनाच दुसरा वर्ग देऊन डांबून ठेवले आहे एवढे खरे !

## कुतुहल प्रश्न

एक महाराष्ट्रीय कुटुंब दुर्गापूजेच्या सुटीत महाराष्ट्रात जाऊन आलं. त्यांचा कॉलेजात शिकणारा मुलगा नि हायस्कूलमध्ये शिकारी मुलगी यांनाही त्यांनी बरोबर नेलं होतंच. तिथे गेल्यावर सर्व आप्तस्वकीयांच्या भेटीगाठी झाल्या. तिथल्या लोकांना या मुलांबद्दल बरंच कुतुहल वाटत होतं. कलकत्त्याविषयी खूप प्रश्न त्यांना विचारण्यात आले. पण सर्वसाधारणपणे अनेकांनी एकच प्रश्न विचारला तो असा–

'काय रे मुलांनो, कलकत्यात नक्षलवादी विद्यार्थ्यांचा फारच सुळसुळाट झालाय् म्हणे. तुम्ही नाही ना अजून नक्षलवादी झालात ?'

ह्या प्रश्नाचं मुलांना मनातून खूप हसू येई. ते उत्तर देत, 'घाबरू नका हो. आम्ही नक्षलवादी झालोही असलो तरी तुम्हाला मात्र काऽऽही करणार नाही बरं !'

## असा फायदा झाला

एका गुजराती कुटुंबात घडलेली गंमतीदार गोष्ट. सासूसुनाचं एकमेकींशी पटत नव्हतं. पाचसहा वर्षे कशीबशी एकत्र काढली. पण आता मात्र चांगलेच बेबनाव होऊ लागले. एकमेकींचा त्या उघड राग करू लागल्या. घरातल्या कर्त्या पुरुषाकडे अर्थातच तक्रारी आल्या. त्याने निमूटपणे सारं ऐकून घेतलं. घरात न्यायाधीशाचं काम करणं भारी कठीण. तो विचार करू लागला. शेवटी बायकोनेच उपाय सुचवला – वेगळं होण्याचा. तिला याने आश्वासन दिलं. ती खूष झाली. त्या दिवशी तो समाधानाने जेवला नि ऑफिसात जायला निघाला.

मात्र ट्रामच्या खिडकीतून त्याला वेगळंच दृश्य दिसलं. जाणाऱ्या येणाऱ्या बसेसवर आणि भिंतीवर ठिकठिकाणी लिहून ठेवलेलं वाक्य त्याच्या डोळयात घुसलं. ते असं होतं–

'सरकारी नोकरांनो, सावध राहा. एक दिवस तुमची डोकी निश्चित धडा-वेगळी होतील.'...आणि त्याच्या मनात खट वाजलं. ऑफिसातही सारेजण याच वाक्याबद्दल चर्चा करू लागले. कारण ते सगळेच सरकारी नोकर ! त्या दिवशी कोणाचेच कामात लक्ष लागेना. त्याच सुमारास लेजिस्लेटीव्ह डिपार्टमेंटचे सेक्रेटरी श्री. विश्वास यांच्या खुनाची बातमी वाचून लोक अस्वस्थ झालेले होते. त्या अस्वस्थतेत आणखीच भर पडली.

हा गृहस्थ घरी आल्यावर बायकोला सर्व हकीकत सांगून म्हणाला–'बघ, अशा परिस्थितीत आपण वेगळे कसे राहणार ? एखादेवेळीं विश्वाससारखी माझीही गत व्हायची. त्यापेक्षा आपण आहोत तिथेच ठीक नाही का ?'

तिला अर्थातच हे पुरेपूर पटलं. तिला ते पटवून घेणंच भाग होतं. तात्पुरता का होईना घरात समेट झाला. माहीतरी आईवडिलांना एकटं ठेवून गावातच वेगळं घर करणं त्याच्या भावनाशील मनाला पटण्याजोगं नव्हतं ! सकाळी वाचलेल्या त्या वाक्याने एका अर्थी त्याच्यावर उपकारच केला म्हणायचा !

□ □

# अमेरिका : बहात्तरचे वेध !

भारतात निवडणुकांचे फड गाजू लागले आहेत. निवडणुका दृष्टिपथात आल्या की, जनसामान्यांची आठवण होऊ लागते. त्यांच्या भल्याच्या घोषणा होऊ लागतात. त्यासाठी नवनवीन योजनांचे संकल्प सोडले जातात. परदेशांचे दौरे, आंतरराष्ट्रीय समस्या वगैरेवरील भाष्ये–हे सारं कमी होऊन घरगुती प्रश्नांवर लक्ष केंद्रित केलं जातं. चार सार्वत्रिक निवडणुकांनी भारतीय जनतेला हे कळून चुकलं आहे. त्याचीच पुनरावृत्ती सध्या चालू आहे. पुढाऱ्यांच्या प्रचार दौऱ्यांना ऊत आला आहे. समाजवादाचे नारे पुनः पुन्हा लावले जात आहेत. सामान्य जनते-वर आश्वासनांचा वर्षाव होत आहे. बँकांचे दर वाढवले गेले आहेत. दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या भावात घट कशी होईल तिकडे लक्ष पुरविलं जात आहे...

लोकशाही जीवनपद्धतीत, पाच वर्षांनी एकदा का होईना, पण जनताजनार्दनाच्या हाती अमर्याद शक्ती येते. त्यावेळी ही शक्ती आपल्या बाजूनं वळवून घेण्यासाठी तिची हरप्रकारे पूजा बांधण्याचं काम राजकीय पक्षांना करावं लागतं. भारता-सारख्या, बहुसंख्य अशिक्षित वस्ती असलेल्या देशात ही स्थिती आहे. मग अमेरिके-सारख्या लोकमत जागृत असलेल्या देशात राजकीय पक्षांना हे पथ्य सतत पाळावं लागत असल्यास नवल काय? निदान अमेरिकन राष्ट्राध्यक्षांनी तरी, १९७२ ची अध्यक्षीय निवडणूक नजरेसमोर ठेवून अशा तऱ्हेचं धोरण स्वीकारलेलं आहे असं वाटतं. दोन वर्षांपूर्वी अध्यक्षपदावर विराजमान झाल्यापासून, अध्यक्ष निक्सन ह्यांनी क्वचितच, कधी अमेरिकेच्या अंतर्गत प्रश्नांवर लक्ष केंद्रित केलं असेल. त्यांच्या कामकाजांची नोंद ठेवणारे म्हणतात, 'काम केलेल्या प्रत्येक पाच तासांपैकी चार तास निक्सन ह्यांनी आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर घालवले आहेत...शिकागोची, वॉशिंग्टनची नसेल, एवढी साद्यंत माहिती निक्सन ह्यांना चिलीची, मध्यपूर्वेची असेल...'।

परंतु ७० मधल्या सिनेट निवडणुकांनी रिपब्लिकन्सना चांगलाच धक्का दिला. त्यातच त्यांचं विएतनाम, कंबोडिया धोरण, अमेरिकेत पसरलेली मंदीची लाट, वाढती बेकारी व वाढती महागाई, वाढत्या कामगार चळवळी, वाढती गुन्हेगारी... गेल्या कित्येक वर्षांत अनुभवली नव्हती अशी आर्थिक परिस्थिती आज अमेरिकेत उद्भवली आहे. त्यातच सिनेटर एडवर्ड केनेडी, एडमंड मस्की वगैरे संभाव्य अध्य-

क्षीय उमेदवारांची लोकप्रियता वाढत आहे. घेण्यात आलेल्या ' नमुना पाहाणी 'त ह्या उलट निक्सन ह्यांचं मताधिक्य घसरलेलं आढळून आलं आहे. ह्या पार्श्वभूमीवर, १९७२ च्या अध्यक्षीय निवडणुकीत आपलं स्थान शाबूत ठेवण्यासाठी प्रे. निक्सन ह्यांनी धडपडणं साहजिकच ठरतं. ह्याच धडपडीतनं निक्सन ह्यांनी आता आपली अंतर्गत प्रश्नांवरील आघाडी उघडली आहे. भारत-पाकिस्तान झगडा किंवा मध्यपूर्वेतली समस्या, ह्या अमेरिकन जनतेला फारशा स्वारस्य नसणाऱ्या प्रश्नांपेक्षा अमेरिकन जीवनाशी निगडीत असलेल्या प्रश्नांवर, म्हणूनच व्हाईट हाऊसनं आता लक्ष केंद्रीत करायला सुरुवात केली आहे. तिथले गरीब, वृद्ध, मध्यमवर्गीयांचे व वृद्धांचे व गरीबीचे राहण्याचे प्रश्न, शहरांचे बकाल-प्रश्न, वाढती बेकारी, वांशिक तंटे, व सर्वांत महत्त्वाचा म्हणजे आर्थिक-मंदीचा प्रश्न, असे कितीतरी महत्त्वाचे प्रश्न आज अमेरिकन शासनासमोर उभे आहेत. त्यातनं मार्ग काढण्यावरच प्रे. निक्सन ह्यांचं ७२ मधलं भवितव्य अवलंबून आहे.

प्रे. निक्सननाही ह्याची पूर्ण जाणीव आहे; नि त्या दृष्टीनं पावलं टाकायलाही त्यांनी सुरुवात केली आहे. १९७१ साली तुटीचं बजेट व त्याद्वारे बेकारी प्रश्नाला हात घालणं, राज्यांना ज्यादा आर्थिक मदत, कौटुंबिक मदत योजना, डेमॉक्रॅटसच्या योजनेला काटशह देणारी आरोग्य विमा योजना, तुरुंग-सुधार योजना, शहरांचे प्रश्न सोडवणाऱ्या कमिट्या—वगैरे अनेक पावलं प्रे. निक्सन ह्यांनी टाकली आहेत. इतरही अनेक योजना तयार आहेत; संपूर्ण योजना कार्यवाहीत येणं एवढंच काय ते बाकी आहे. ह्या साऱ्यातनं, अमेरिकन जनमत स्वतःकडे झुकवून घेण्यात प्रे. निक्सन कदाचित् यशस्वीही होतील. निदान त्यांना तरी त्याबद्दल खात्री वाटते. गेल्या आठवड्यात टेलिव्हिजनवरील मुलाखतीत म्हणूनच त्यांनी आत्मविश्वासानं सांगितलं, " पुढच्या दोन वर्षांत माझ्या फार मोठ्या आकांक्षा आहेत. स्वतःचं काम कसं करायचं ह्याची मला पूर्ण जाणीव आहे, नि म्हणूनच मी निश्चित आहे यशाबद्दल !"

## रशिया : क्रिया—प्रतिक्रिया

रशियन विमान पळवून न्यायचा प्रयत्न करण्याचा कट केल्याच्या आरोपावरून अकरा रशियन ज्यूंना जबरदस्त शिक्षा ठोठावण्यात आल्याचं, मागच्याच वार्तापत्रात मी लिहिलं होतं. ह्या शिक्षेचे पडसाद आता रशियात व अमेरिकेत गंभीरपणे उमटत असून, त्या दोन देशात एक नवीन द्वंद्व उभं राहिलं आहे. अकरा रशियन ज्यूंच्या शिक्षेचं आणि चाळीस हजार रशियन ज्यूंना इस्रायलला जाण्यास बंदी करण्याचं वृत्त धडकताच, जगभरच्या ' ज्यू 'च्या प्रतिक्रिया व्यक्त होणं साहजिकच

होतं. तेल अविव्हमध्ये लक्षावधी ज्यूंनी प्रार्थना केल्या; तर लंडन, पॅरिस, न्ययॉर्क आदी ठिकाणच्या रशियन वकिलातींसमोर उग्र निदर्शनं झाली. परंतु न्ययॉर्कमधल्या ज्युईश डिफेन्स लीग ह्या संघटनेनं मात्र अमेरिकन दहशतवादी कृत्यांना प्रारंभ केला. अमेरिकेतल्या रशियन नागरिकांविरुद्ध त्यांनी आपली आघाडी उघडली. रशियन नृत्यांगनांच्या कार्यक्रमात त्यांनी गोंधळ उडवून दिला; तर मानहत्तान येथील रशियन प्रवासी कचेरीत बॉंबस्फोट घडवून आणले. आठवड्यापूर्वीच, वॉशिंग्टनमधल्या रशियन वकिलातीच्या सांस्कृतिक केंद्रावर व व्यापारी कचेरीवर बॉम्ब् फेकले गेले. ज्यूईश डिफेन्स लीगच्या कार्यकर्त्यांनी, रशियात चालू असलेल्या ज्यूविरोधी खटल्यांविरुद्ध न्यूयॉर्कभर निदर्शनं केली. "न्यूयॉर्कमधल्या कुठल्याही रशियनास सुरक्षित राहू दिलं जाणार नाही." अशा धमक्याही उघडपणे ह्या संघटनेनी दिल्या आहेत.

ज्यूईश संघटनेच्या ह्या उपद्व्यापांची तीव्र प्रतिक्रिया मॉस्को-लेनिनग्राडमध्ये होणे, क्रमप्राप्तच होतं. त्या प्रतिक्रियेतच, मॉस्कोतल्या अमेरिकन दूतावासात वावरणाऱ्या अमेरिकनांना धमक्या येऊ लागल्या. क्वचित त्यांना हाताळलंही जाऊ लागलं. अमेरिकेतले रशियनांवर होणारे अत्याचार जर ताबडतोब थांबले नाहीत तर, त्याचे गंभीर परिणाम मॉस्कोतल्या चारशेहून अधिक अमेरिकनांनाही भोगावे लाग ेल, अशी गर्भित धमकीही, मॉस्कोतल्या निदर्शकांनी अमेरिकन दूतांना दिली आहे. रूसो–अमेरिकन राजनैतिक संबंधात अशा प्रकारचा विलक्षण तणाव प्रथमच निर्माण झाला असून, उच्च पातळीवरून ह्या संबंधात बोलणीही सुरू झाली आहेत.

ह्याच वेळी रशियात सुरू असलेल्या ज्यूंच्या खटल्यावरून, जगाचे लक्ष अन्यत्र विकेंद्रित करण्याचे पद्धतशीर प्रयत्न मॉस्कोनं सुरू केले आहेत. कु. अँजेला डेव्हिस ही एकवीस वर्षांची तरुणी. तिच्यावर अमेरिकन न्यायालयात, रशियासाठी हेरगिरी केल्याच्या आरोपावरून खटला चालू आहे. कम्युनिस्ट विचारसरणी स्वीकारलेल्या व 'काळ्या-लोकांसाठी कार्यरत असणाऱ्या तरुणीला सूडभावनेनं वागवलं जाऊ नये; तिला चांगली वागणूक मिळावी,' असं पत्र चौदा रशियन शास्त्रज्ञांनी प्रे. निक्सन ह्यांना लिहिलं असून, त्याला फार मोठी प्रसिद्धी मॉस्को, पूर्व बर्लिन वगैरेनी दिली आहे. साखारोव्ह ह्या रशियन अणुशास्त्रज्ञानांही, कु. अँजेला डेव्हिस-बद्दल अध्यक्ष निक्सन ह्यांना लिहिलेल्या पत्राला अशीच अमाप प्रसिद्धी दिली आहे. परंतु त्याचवेळी साखारोव्ह ह्यांनी, ज्यूंना मिळणाऱ्या वागणुकीसंबंधात प्रे. पॉडगॉर्नी ह्यांना लिहिलेल्या पत्राबद्दल मात्र संपूर्ण मौन पाळलं आहे.

चौदा शास्त्रज्ञांना अमेरिकन अध्यक्षांनी पाठवलेलं पत्र मात्र मोठं समर्पक आहे. त्यांनी त्या चौदाही शास्त्रज्ञांना, कु. अँजेला डेव्हिसच्या खटल्याच्या वेळी उपस्थित राहण्यासाठी अमेरिकेला येण्यासाठी निमंत्रण धाडलं आहे. कल्पना मोठी स्तुत्य आहे. ज्यूंच्या खटल्याच्या वेळी तेल अविव्हच्या प्रतिनिधींनी मॉस्कोला जावं;

हिंदी नागरिकांच्या पाकिस्तानातल्या किंवा चीनमधल्या खटल्याच्यावेळी हिंदी प्रतिनिधींनी इस्लामाबाद किंवा पेकींगला जावे; हनोईतल्या खटल्यांच्या वेळी सायगांवच्या प्रतिनिधींनी उपस्थित राहावं...

ह्या कल्पना सत्यापासून फार फार दूर आहेत एवढंच !!

□ □ □

## बेडकांची युद्धं-मलेशियाची आपत्ती

मलेशियात नुकतच पावसानं थैमान घातलं. नद्यांना महापूर आले. राजधानी कौलालंपूर साऱ्या देशापासून व जगापासून तोडली गेली. शेकड्यांनी प्राणांना मुकले तर लक्षावधींना बेघर व्हावं लागलं. सिंगापूर, ब्रिटीश, ऑस्ट्रेलियन विमान-दलांची मदत-विमानं घेऊन येणाऱ्या विमानांवर लक्षावधीत जीवित अवलंबून राहिले. पंतप्रधान टुन अब्दुल रझाक ह्यांना राष्ट्रीय आणीबाणी जाहीर करावी लागली.

मलेशियातल्या ह्या भयानक थैमानापूर्वीच काही दिवस सुनगी सिपुत् ह्या छोट्याशा प्रदेशावर बेडकांचं तुंबळ युद्ध झालं. सुमारे पन्नास साठ बेडकांनी आपसात भांडायला सुरुवात केली. थोड्याच वेळात ह्या 'युद्धात' तीन हजार बेडकांनी भाग घेतला. दोन दिवसांच्या तुंबळ युद्धानंतर किमान ७०० बेडकं मृतावस्थेत, छिन्नभिन्न होऊन पडलेली होती. बेडकांच्या युद्धाची ही वार्ता जाहीर होताच, मलाय ज्योतिष्यांनी वर्तवलं होतं की, राष्ट्रावर कुठलं तरी संकट येत आहे !

त्यांचा हा तर्क साधार होता. कारण ही बेडकांची युद्धं मलाय लोकांना नवीन नाहीत, आणि ज्या ज्या वेळी ही युद्धं झाली; त्या त्या वेळी मलायावर काही ना काही राष्ट्रीय संकट कोसळलं आहे. १९४० मधल्या अशाच बेडूक-युद्धानंतर लगेचच, जपान्यांनी मलाया पादाक्रांत केला. १९४८ मध्ये, बेडूक युद्धानंतरच, मलेशियाला कम्युनिस्ट अराजकवाद्यांविरुद्ध एका तपाचं तुंबळ युद्ध खेळावं लागलं आणि १९६९ मधल्या जातीय दंगली उसळण्यापूर्वीही केवळ दोनच आठवडे पेनांगजवळ असंच बेडकांचं तुंबळ युद्ध झालं !

# अंधाराचा स्पर्श

राम फाटक

असं किती दिवस चालणार आहे तेच समजेनासं झालं आहे. आज दोन वर्षे झाली हे एकटेपण खायला उठलं आहे. विचारांनी डोकं नुसतं भणाणून जातं. मन गुंतवण्यासाठी वाचावं असं म्हणतात. पण वाचायचं तरी किती ? तारुण्यातली जी वर्षे सुखात, स्वप्नात उबदार कुशीत घालवावयाची त्याऐवजी पुढं काय ? ह्या एकाच विचाराभोवती फेर धरून आला दिवस गेला समजायचा. लग्नानंतर वर्ष दीड वर्ष काय ते सुख मिळालं, मिळालं म्हणण्यापेक्षा मिळवलं असंच म्हटलं पाहिजे. कारण त्यात प्रेम नव्हतं, शाश्वती नव्हती, अधिकार नव्हता. केवळ कर्तव्य म्हणूनच ते मिळत होतं. सुखाच्या सप्तपदीनंतर दुःखाला सामोरं जावं लागणार आहे हे समजलं असतं तर ती सात पावलं टाकण्यापेक्षा सप्तपाताळात जाणं मी आनंदानं स्वीकारलं असतं. पतीच्या नावानं कपाळावर लाल टिकली लावताना हाच रंग धोक्याची पूर्वसूचना देण्यासाठी असतो हे त्या नव्या नव्हाळीत लक्षातही आलं नाही. ते कुंकू त्या नावानं लावण्यापेक्षा अखंड कुमारीका किंवा विधवा... हो विधवा म्हणून जगणं पत्करले असते पण आता मी कोण ? सधवा का विधवा ? काहीच नाही. जगाच्या दृष्टीने सधवा, मनानं विधवा. घटस्फोटासाठी दूर राहिले तर त्यात सधवेपेक्षा विधवेचं जीणंच जास्त आहे.

माझ्या आयुष्याशी खेळ करून जर दुसऱ्या खेळण्याबरोबर खेळायचं होतं तर मग लग्नाचा विचारच करायचा नव्हता. लग्नाआधी प्रेम होतं तर तिच्याशीच लग्न करायचं होतं. त्यासाठी माझा बळी का घेतला ? का देवीला प्रसन्न करण्यासाठी बळी देतात. म्हणून तर हे अघोर कृत्य केलं नव्हतं ना ?

जगाच्या वखवखलेल्या, आधाशी नजरेच्या आगीत मी मात्र होरपळून जाते

आहे. पण आता विचार करून काय उपयोग ? त्या आगीशीच आता टक्कर देणं भाग होतं.

त्या आगीची सवय आता झाली होती, त्याची दाहकता आता मला जाळत नव्हती. पण...पण मनातली ती धुमसणारी आग मला आतून जाळत होती, त्याचं काय ? दिवसभराचे ठीक आहे. कामात असल्यावर मन रमून जातं. पण रात्री गादीवर पडल्यावर विकारांचा अंधार ग्रासून टाकतो त्याचं काय ? विकारांच्या वावटळीत विचारांचा पालापाचोळा गोलगोल फिरत मला उंच नेतो व एकदम विवेकाच्या भिंतीवर आदळतो तेव्हा दुःखाने रक्ताळलेले मन खाली यायला तयार नसतं. पुरुषांच्या एका स्पर्शासाठी आसुसलेलं मन, पुरुष दिसल्यावर एकदम कासवासारखं संकोचून जातं. असं का ? माझा स्वभाव की, भ्याडपणा. पण एक-दिवस ह्या भ्याडपणावर विकारांची मात होणार हे मी ओळखून होते आणि झालंही तसंच.

बसस्टॉपवर उभी असताना सहजच माधव भेटला. खूप जुनी ओळख होती. पण मध्यंतरी ८–१० वर्षे बदलीमुळे भेट झाली नव्हती. सुरवातीला मी ओळखलंच नाही. पण त्याने हळूच हाक मारली.

"वासंतीच ना ?"

"हो" मी आश्चर्यानं त्याच्याकडे पहात म्हटले.

"ओळखलं मला ?"

"अं...अं ! सुरवातीला नाही पण आता ओळखलं. माधवच ना ?"

"हो ! फार वर्षांनी गाठ पडतेय, पण ओळखायला फार त्रास झाला नाही कारण तुमच्यात फारसा बदल झाला नाही."

मी संकोचाने आजुबाजूला पाहिले. तो तिरक्या नजरेने बसच्या क्यूकडे पहात होता. नंतर माझ्याकडे रोखून पाहू लागला. मी उगीचच हसले व पदर सारखा केला. बस आल्यावर आम्ही आत चढलो. सुदैवाने त्याला माझ्याजवळ जागा मिळाली नाही हे उत्तम झालं.

त्यानंतर अधूनमधून आमची गाठ पडत होती. जुजबी बोलणं होत होतं. त्यानं कधीही माझ्या खाजगी जीवनाबद्दल विचारलं नाही. फक्त आईवडील कसे आहेत एवढंच ! पण तेही उपचार म्हणून. माझी ही परिस्थिती पाहण्यास ते हजर नव्हते हे बरं होतं. मीही त्याला त्याच्या खाजगी जीवनाबद्दल कधीच विचारलं नव्हतं. तस काही कारणही नव्हतं. पण तेवढ्या औपचारीक भेटीमुळेही माझ्या छातीत धडधडत असे.

एके दिवशी त्यानं सहज विचारलं.

"राग येणार नसेल तर एक विचारू ?"

मी न बोलता फक्त मान हालवली. आता हा काय विचारणार आहे ? नको तो प्रश्न पुन्हा ऐकावयास मिळणार की काय ?



" मी काल नाटकाची तीन तिकीटे काढली आहेत. एक मित्र सहकुटुंब येणार होता पण रहित झालं. तेव्हा आपण आला तर..."

माझी चलबिचल त्याच्या ध्यानात आली असावी. हसून तो म्हणाला " हे पहा आग्रह नाही. कुणाला तरी विकण्यापेक्षा तुम्हाला विचारलं. नाही तरी दुसरं विकावं लागणार आहेच "

' येईन ना ' मी चटकन बोलून गेले आणि माझी मलाच भीती वाटू लागली. पण आता वेळ गेली होती. ज्याच्यावर मी ताबा ठेवण्याचा प्रयत्न करते आहे तेच मन बोलू गेलं असावं. त्याने खिशातून तीन तिकीटं काढली. एक मला देऊन म्हणाला,

" परस्पर थेटरवर या ६॥ ला. म्हणजे मी येईपर्यंत तुम्हाला वेड्यासारखं थांबायला नको. "

पेपरवाल्याप्रमाणे, तो तिकीट देऊन निर्विकारपणं निघून गेला. मी तिकीट पर्स मध्ये ठेवून ऑफीसचा रस्ता धरला.

ऑफीसमध्ये कामात लक्ष लागेना. आपण केलं ते योग्य केलं का? पण काय चुकलं. नुसत गेलं तर, पण आपल्या मनाला तो अंधार पुन्हा खोल गर्तेत ओढून नेणार नाही ना? पण...पण, त्याच्याकडे पाहिले आणि मग...मग मला नाही म्हणवेना. त्याची वागणूकही सभ्य माणसासारखी होती. त्याच्या व्यक्तिमत्वाने मनाची चलबिचल झाली हे नाकारण्यात काय हंशील. ते पिंगट डोळे, गोलसर बांधा, मध्यम उंची, लांब नाक, ओठावरची ती काळीभोर रेघ व सौंदर्यात भर टाकणारा तो एक तुटका दात. छे? पुन्हा पुन्हा तो चेहरा येत होता. क्षणभर माझाही तोल गेला व माझं मलाच हसू आलं. कदाचित इतक्या दिवसांनी तो स्पर्श मिळेल हा स्वार्थ त्यात होता. पण त्या स्पर्शावर समाधान होईल का? का जिराफासारखी मान उंच करून माझं हावरं मन ती सुखाची पालवी तोडण्याचा प्रयत्न करणार?

थिएटरवर मी वेळेवर गेले. शेजारची खुर्ची अद्याप रिकामीच होती. मी मान वळवून दरवाजाकडे पाहिले. तो कुठच दिसला नाही. उगीचच हाताची चाळवा-चाळव झाली. का आला नाही तो? प्रेक्षागृहातले वातावरण पाहून क्षणभर डोळ्यात पाणी तरारलं. अत्तराचा सुगंध समोरच्या रांगेतून येत होता. नटूनथटून येणारी जोडपी हलक्या आवाजात कुजबुजत आपापल्या जागेवर बसत होती. ओळखीच्या माणसांना हसूनच लांबून नमस्कार केले जात होते. येथे कोणाचे तरी कोण होते. मी एकटी वाळवंटात तापत असलेली. सगळ्यांचा असा संताप आला वाटलं खच्चून ओरडावं. सगळा साजशृंगार ओरबाडून काढावा पण...

"जरा सरकता का?" तोच होता. हातात दोन मोठी कागदाची पुडकी होती. शेजारी बसल्यावर एका मंद सुगंधी अत्तराने क्षणभर बरे वाटले. माझं कोणीतरी होतं. पण माझंच होतं का? का हा माझा विचार? त्याला काय वाटतं?

"म्हटलं उशीर होतो काय? ही खरेदी करायची होती अंजू मंजूसाठी." तेवढ्यात तिसरी घंटा झाली. प्रेक्षागृहातले दिवे मंद होत गेले. समोरचा लाल मखमली पडदा मात्र उजळून निघाला होता.

"अंजू मंजूला?" म्हणजे...म्हणजे याचं लग्न झालंय? आणि हा एकटा कसा? शेवटी माझीच फसगत झाली. माझ्या विकारी मनानं मला फसवलं. हा संसारी आहे आणि मी...मी कशाला आले इथं? माझ्या किंचित स्वार्थासाठी का केवळ एका आसुसलेल्या स्पर्शासाठी? छे!

"शेजारचं तिकीट विकून टाकलं, एकच होतं म्हटलं कोण घेणार? कारण नाटक सिनेमाला जोडीनंच येणारे जास्त. पण खपलं!"

मी भानावर आले. नांदी संपून पडदा वर गेला होता. हळूहळू माझं मन स्थिर

झालं. समोर रमू लागलं. तशी सवयच झाली होती. समोरच्या जगाशी चटकन रमून जाणं माझ्या अंगवळणीच पडलं होतं. मध्येच त्याने पाय लांब करून दोन्ही पुडकी खुर्चीखाली ठेवली. माझ्या पायाला त्याच्या पायाचा स्पर्श झाला. पण तेवढ्याने सबंध अंगातून एक शिरशिरी उठली. वास्तविक ऑफीसमध्ये, बाहेर रस्त्यावर परस्पर्श होत होताच पण या स्पर्शाने मनात घर केल्यामुळे तो निराळा वाटला.

माझ्यातला तो राक्षस फणा काढू लागला होता. मी पाय बाजूला न घेता तसाच ठेवला. आता मी माझी राहिली नव्हते. कोणीतरी ताबा घेतल्यामुळे मला माझं अस्तित्व जाणवत नव्हतं. त्यानेही हालचाल केली नाही. एकटक तो समोर पहात होता. काही काळ मी आजूबाजूचे सर्व विसरले. करंगळीचा होणारा तो गरम स्पर्श हवाहवासा वाटू लागला. मध्येच एक विनोद झाला तेव्हा त्याने माझ्याकडे हसून पाहिले. मीही उगाचच हसले. माझं मलाच आश्चर्य वाटत होतं. मी चांगलीच धीट झाली होते.

पहिला अंक संपल्यावर तो बाहेर निघाला. त्याने मला येण्याविषयी खूण केली. मी भारल्यासारखी त्याच्याबरोबर बाहेर पडले. गर्दीतला तो निकट स्पर्श मला हवा होता. आता इतरांचा हेवा मला वाटत नव्हता. मलाही काही काळ ते सुख मिळत होते. वेफर्स घेऊन आम्ही आत येऊन बसलो.

दुसऱ्या अंकात मात्र मला अस्वस्थ वाटू लागलं. खांद्याला होणारा स्पर्श, मधूनच पायाला होणारा तो स्पर्श, तो सुगंध, कानाशी बोलताना होणाऱ्या त्या गुदगुल्या, सुपारी घेताना तळव्यांना स्पर्श करणारी ती उबदार बोटे. सर्व काही हवंसं वाटू लागलं, दोन्ही हातांनी ओढून घ्यावसं वाटू लागलं. प्रेक्षागृह खळाळून हसले तेव्हा मी भानावर आले. त्याने टाळीसाठी हात पुढं केल्यावर मी धिटाईने टाळी दिली. काय घडलं ते मलाही कळलं नाही. बराच वेळ हातात हात होता. त्या गरम स्पर्शाने मी पुरती पेटले. वाटलं त्याच्या खांद्यावर डोके टेकून मनसोक्त रडावं. मन रितं करावं. पण ते शक्य नव्हते. तो कोण ? त्याने माझं दुःख का ऐकावं ? सबंध नाटक पाहण्याकडे माझं लक्ष नव्हतं.

नाटक सुटल्यावर बससाठी चालत आम्ही बरेच लांब आलो. चालताना होणारा स्पर्श पुन्हा पुन्हा डंख मारीत होता.

" तुम्ही आल्यामुळे बरे झाले, कंपनी मिळाली."

" होना. मीही बरेच दिवसात नाटकाला आले नव्हते. त्यामुळे बरे वाटले आणि मुद्दाम कोण येणार ? कोणी बरोबर असलं म्हणजे बरे वाटते."

माझ्या गळ्याकडे पुन्हा त्याची नजर गेली मी पदर सावरून घेतला.

खोलीवर आल्यावर पुन्हा त्या अंधाराच भय मला वाटू लागलं. काळाकुट्ट अंधारात तोच एक अंधुक प्रकाश मला दिसत होता. त्याच्याकडे धाव घेण्यासाठी माझं मन झेप घेत होतं. पण कितीही प्रयत्न केला तरी तो ठिपका जवळ येत

नव्हता. मी मात्र अंधारात विरघळत होते. आणखी किती दिवस मी या अंधाराची सोबत करणार ? किती दिवस......किती दिवस ?... फक्त एक वर्ष. मग मी मोकळी होते. सरळ सरळ जगाला तोंड द्यायला. एक घटस्फोटीता म्हणून. पुन्हा त्या डंखाची भिती न बाळगता विष पचवायला. पण त्यासाठी त्याच्या संसाराचा बळी देऊ, माझा [दिला तसा ? हे विष तिला पचवण्याची वेळ आणून देऊ का म्हणून ? काय हक्क आहे माझा ? त्याला माझ्याबद्दल काय वाटतं ? याचा कधी मी विचार केला आहे ? त्याच्या स्पर्शामागची भावना साधी असेल, पण आपण त्याचा निराळा अर्थ घेतला आणि माझी परिस्थिती त्याला माहीत तरी आहे का? का प्रौढ कुमारीका म्हणून तो माझ्याकडे पाहतो. तस असेल तर त्याचा तोल सांभाळायला हवा आणि ते मलाच केलं पाहिजे पण त्याचा तोल जाणारच नाही. तो संसारात सुखी आहे. मीच मला लगाम घालायला हवा पण...पण क्षणभर तरी तो स्पर्श मला सुख देतो ना ? उद्या माझी भूक वाढणार नाही कशावरून ? नाही हे तोडायला हव, हे संपवायला हवं. गाडून टाकायला हवं. आणि तेही लवकर पालवी फुटायच्या आत अंधारातला तो ठिपका सापडायच्या आत.

आठ दिवस आमची भेट झाली नाही. मला बरं वाटल. आपोआप दूर होण्याची वेळ आली होती. मी शांत होते. आणि आज अचानक ऑफीसमध्ये त्याचा फोन आला. मी भेदरले. मनाने पुन्हा उचल खाल्ली तर ? वाघाच्या तोंडाला रक्ताची चटक लागलेली वाईट.

"हॅलो, वासंती का ?"


# व्होल्गा जेव्हा लाल होते

**ले. : वि. स. वाळिंबे**

**मूल्य : अठरा रुपये**

**राजहंस प्रकाशन**

" हो "

" हे पहा थोडं काम होतं तुमच्याकडे "

" बोला "

" अहं ! फोनवर नाही सांगता येणार "

" मग ?"

" संध्याकाळी ६॥ वाजता ठाण्याला थांबा. एक नंबरवर. मग सांगतो."

मी फोन बंद केला. पुन्हा रस्सीखेच चालू झाली. आणि आता पुढं काय वाढून ठेवलंय तेच कळेना.

संध्याकाळी माझी वाट पहात तो उभा होता.

" चला " समोरच्या आसरामध्ये मी त्याच्यामागून गेले. आता मला भीति वाटत नव्हती. विचार फक्त एकच. रस्सीखेच चालू असताना दोरी एकदम सोडून द्यायची. मग काहीही होवो.

चहा समोर आल्यावर तो म्हणाला.


" रविवारी माझ्याकडे सत्यनारायण आहे तेव्हा तुम्ही जरूर या. हा माझा पत्ता.' त्याने पत्ता लिहून दिला.

" एवढ्यासाठी बोलावलत ? मग फोनवर सांगायचं."

" अहं ! तसं नाही " त्याचं हास्य मावळलं. चेहरा बदलला. क्षणभर तो थांबला. कपाभोवती बोट फिरवत म्हणाला.

" गेल्या रविवारी माझा रजिस्टर्ड विवाह झाला. त्या निमित्त सत्यनारायण आहे. अगदी मोजक्याच लोकांना बोलावलं आहे. कारण...कारण पुर्नविवाहाची इतकी जाहिरात करणं बरं नव्हे असं मला वाटतं."


मला जोराचा ठसका लागला. पुढचं काहीच आठवत नाही. मी जाणाऱ्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहात राहिले. भोवताली तो अंधार विषारी डंख मारणारा आणि मध्यभागी तो अस्पष्ट होत जाणारा प्रकाशाचा ठिपका हात न पोचण्याइतका लांब.



# नर्जरची सफर

**संजीवनी खेर**

१९१६ ते १९१८ चा काळ होता. पहिले महायुद्ध भडकलेले. अशा वेळी युद्ध व विजयाची आकांक्षा शत्रु-मित्र राष्ट्रातील प्रत्येक माणसाला बेचैन करीत होती. जर्मनीतील सामान्य माणसाचे सर्व व्यवहार युद्धकामासाठी जुंपलेले होते. साऱ्यांच्या शक्ती स्वतःच्या राष्ट्राचा मानबिंदू उंचावा ह्यासाठी खर्च होत होत्या. जर्मनांनी युद्धात अलौकिक देशनिष्ठा, स्वामिभक्ती व असीम त्याग केला ह्यात दुमत नाही. कौरवपक्ष झाला म्हणून काय झाले, त्यांच्यातील व्यक्तीचे असामान्य तेज काही हिणकस ठरत नाही, स्वामिनिष्ठा क्षुद्र ठरत नाही. वीर तो वीरच, मग तो अभिमन्यू असो किंवा कर्ण असो! उद्देश? जर्मनांचे युद्धनीतिकौशल्य व त्यातील नर्जर-सारख्या कप्तानाचे लोकविलक्षण धैर्याची दाद देणे हा आहे. युद्धकाळात त्याच्या मायभूमीत अन्नधान्याची तीव्र टंचाई निर्माण झालेली होती. सैन्याला उत्कृष्ट अन्न पुरवणे एक समस्या होती. इंधन वा तत्सम सामग्रीच्या चणचणीने लष्करी विभाग हैराण झालेला होता. अशा वेळी शत्रुराष्ट्राच्या व्यापारी बोटी भुलवून आणून सामग्री जमवणे हाही एक मार्ग होता. त्यासाठी १० विनाशिका, व्यापारी बोटींचे रूप धारण करून बाहेर पडल्या. परंतु त्यापैकी फक्त दोनच आपले इच्छित साध्य करून जर्मनीला परत आल्या. त्यापैकी वुल्फ ही बोट २४ फेब्रुवारी १९१८ ला कील ह्या किनाऱ्यावर येऊन थडकली. जर्मन अधिकाऱ्यांच्या आनंदाला पारावार राहिला नाही. त्यांनी तर वुल्फच्या परतीची आशाच सोडली होती. कॅप्टन नर्जरचा उत्साह व आनंद उसळचा मारत होता. त्याने साहलेल्या कष्टांची, संकटांची आज देशप्रेमीयांनी हार्दिक



स्वागत करून समाप्ती केली होती. नर्जरने 'वुल्फ' विनाशिका केवळ सुखरूपच नव्हे तर कोळसा, इतर वाहनांना लागणारे इंधन यांनी भरून आणली होती. १,३५,००० टनांच्या बोटींना जलसमाधी देऊन ६४,००० मैलांचा जगप्रवास करून ५०० कैद्यांना घेऊन मायदेशी परत यायचे भाग्य त्याला लाभले होते. अर्थातच हे त्याच्या परिश्रमानेच साध्य झालेले होते.

वुल्फ बोटीची ही धाडसी सफर म्हणजे जर्मनांच्या युद्धनीतीतला एक कौशल्यपूर्ण चाणक्य बेत म्हणावा लागेल. वुल्फ बोटीचा कप्तान नर्जर ह्या कपटनीतीतला चाणाक्ष, बुद्धिमान व शूर नेता होय. राष्ट्राच्या गरजा पूर्ण करण्यासाठी केलेल्या युद्धनीतीपैकी व्यापारी नौका धरणे ही महत्त्वपूर्ण नीती होती. लहानश्या राष्ट्राच्या जगड्व्याळ महत्त्वाकांक्षेला अशा लहान लहान युक्त्यांनी पुष्कळच हातभार लावला.

वुल्फ ही एक प्रचंड व्यापारी बोटीचे रूप घेतलेली युद्धनौका होती. वुल्फवरील टेहळणी विमान व्यापारी बोट दृष्टिक्षेपात आली की वुल्फवर संदेश पाठवी व मग ती बोट गिरफदार करण्याचे प्रयत्न होत. फेब्रुवारी १९१७ मध्ये वुल्फ पॅसिफिक समुद्रात असताना टेहळणी विमानाने एक ब्रिटिश माल व प्रवासीवाहू जहाज 'वयरूना' हेरले. टेहळणी विमानाने स्वतःच्या शक्तिप्रदर्शनार्थ वयरूनाच्या जवळ एक बॉम्ब टाकला व पाठोपाठ बिनतारी संदेश बंद करण्याचा आदेश दिला व स्वतःच्या बरोबर बोट नेण्याचा आदेश दिला. इकडे वुल्फच्या साध्या दिसणाऱ्या डेकवर अचानक

तोफा व मशीनगन्स दिसू लागल्या. टॉर्पिडो सज्ज झालेले पहाताच व्यापारी बोट शरण आली. वुल्फचा आक्रमक पवित्राच बहुधा व्यापारी बोटींना शरण आणण्यास पुरेसा असे. वुल्फच्या अधिकाऱ्यांनी मग तातडीने जाऊन वयरूना ताब्यात घेतली. त्यावरील नाविकांना व प्रवाश्यांना कैद केले. वयरूनावरील कोळसा, तेल, कापड, अन्नधान्य, हवाबंद मांसमाश्याचे डबे वुल्फवर आणले. सर्वात अमूल्य गोष्ट म्हणजे ४०–५० मेंढ्या वुल्फच्या अधिकाऱ्यांनी वयरूनावरून धरून आणल्या. अनेक दिवस ताजे मांस व अन्न न मिळालेल्यांना ती मोठ्ठी मेजवानीच होती. बोटींवरील कैद्यांना अत्यंत सौजन्याने वागवायचे याकडे नर्जरचे लक्ष असायचे. विशेषतः स्त्रिया, मुले व वृद्ध यांना योग्य ती वागणूक मिळे. वयरूनावरील सर्व माल आणणे म्हणणे एक जिकीरीचे काम होते. दोन्ही अवाढव्य बोटी जवळजवळ उभ्या करून हे सामान आणण्याचे काम, उसळत्या लाटांनी बोटी एकमेकावर धडाधड आपटत असतानाही १५ दिवसपर्यंत अविश्रांत चालू होते. ह्या अवधीत १२ हजार टन कोळसा व इतर सामग्री वुल्फ बोटीवर आणली गेली.

नवनवीन युक्त्या करून शत्रुला हुलकावणी देऊन त्यालाच जाळ्यात पकडायच्या कामात नर्जर अजोड होता. त्याच्यापाशी विविध देशांच्या झेंड्यांच्या भरपूर संग्रह होता. समोरून येणाऱ्या बोटीवरील ध्वजाला अनुकूल वा तोच ध्वज वुल्फवर फडकू लागे. तर कधी तटस्थ राष्ट्राचा ध्वज लावण्यात येई कधी. आपण संकटात असल्याचा बहाणा करून दुसऱ्या बोटीला जवळ बोलावले जाई व मग बॉम्बहल्ला करून त्या बोटीला शरणागती पत्करावी लागे. वयरूनाप्रमाणेच नर्जरने माटुंगा, वयग्यु (Waigeu) व इतर अनेक बोटींचे कौशल्याने हरण केले. बहुतेक बोटी नर्जरच्या पहिल्या आदेशावरच शरण आल्या होत्या. परंतु 'हिटॅची मारू' या जपानी बोटीने प्रतिकाराचा दुबळा प्रयत्न केल्याने नर्जरला तिला शरण आणण्याकरीता प्रवासी उभे असलेल्या डेकवर बॉम्बहल्ला करावा लागला. त्यात अनेक प्रवासी मृत्यू पावले परंतु त्यांना अत्यंत मानाने, व्यवस्थित, पद्धतशीर अंत्यसंस्कार नर्जरने केले. तेही अत्यंत आपुलकीने. टेहळणी विमानाने हिटाची मारूला हेरताच नर्जरने हिटॅचीच्या कप्तानाला शरणागतीचा आदेश दिला. आपली शक्ती दाखविण्यासाठी बोटीजवळ एक बॉम्ब टाकला. बिनतारी संदेश पाठविणे बंद करायला सांगितले. प्रथम कबूल करून हिटॅचीने संदेश पाठविणे पुनः सुरू केले. आपल्याजवळच्या अपुऱ्या साधनांनी लढाईची तयारी दर्शविली. मग मात्र नर्जरने हिटॅचीवर तोफांचा भडीमार करायचा आदेश दिला. तिला क्षतविक्षत करण्यात आले. हिटॅची मारूने योग्य वेळी आज्ञा पालन केले असते, पळून जायचा प्रयत्न केला नसता व सर्वात महत्त्वाचे अनोळखी बोटीजवळ जायचा धोका पत्करला नसता तर ? परन्तु नर्जरचा अंदाज बरोबर होता. डेकवर हल्ला होताच हिटॅची शरण आली. त्यावरील प्रवाशांना कैद करण्यात आले. परन्तु वुल्फवर आल्यावर मात्र हिटॅचीच्या कप्तानाने नाट्यपूर्ण

रीतीने हाराकिरी केली. हिटॅंची मारूला मग मालदिव द्विप समूहाकडे नेण्यात आले. ह्या ठिकाणी जाण्यात धोका होता, पण हिटॅंची अधिक मूल्यवानं होती. तीवरील तांबे, रबर, चहा, हजारो टिन ॠॅब व मासे, कापसाचे गठ्ठे मातृभूमीच्या तातडीच्या गरजा भागवण्याच्या दृष्टीने उत्तम होते म्हणून हिटॅंचीला संपूर्ण रिकामी करून जलसमाधी देण्यात आली.

पुढील प्रवासात नर्जरला कोळश्याच्या साठ्याला आग लागून बुडून मरायची वेळ आली होती पण आग लागताच बोट सोडून जीव वाचवायचा प्रयत्न न करीता शर्थीने नर्जरने ती आग काबूत आणली. कोळश्याचा साठा अर्धा झाला होता. सुदैवाने दुसरे दिवशीच एक कोळसावाहू स्पॅनिश बोट नजरेच्या टप्प्यात आली. वास्तविक स्पेन तटस्थ राष्ट्र होते. पण नर्जरपुढे जीवनमरणाचा प्रश्न उभा होता. जर्मनीत सुखरूप परत जायचं की समुद्रात इंधनाअभावी डुबून मरायचं ! अर्थातच नर्जरला जगायचं होतं व म्हणूनच ' इगो मंडी ' ह्या स्पॅनिश बोटीवरचा कोळसा मिळवणं जरूर होतं. व म्हणूनच ' इगो मंडी 'ला घेरले गेले. पकडले गेले. समुद्रातील एका टेकाडाजवळ येऊन नर्जनने इगो मंडीचा कोळसा वुल्फवर आणायला सुरुवात केली. त्याबरोबरच 'इगो मंडी'ला रंगवण्याचेही काम करण्याचा आदेश दिला. वुल्फ बोट माणसांनी भरून गेली होती. त्यातील काही स्त्रिया, मुले व इतरांना इगो मंडीवर कॅप्टन रोझच्या नेतृत्वाखाली धाडण्यात आले व कुणाला शंका येऊ नये म्हणून दोन्ही बोटी वेगवेगळ्या मार्गाने केपटाऊनला भेटायचे ठरवून निघाल्या.

१९१७ वुल्फला घेऊन देश सोडून भटकंतीला नर्जरला एक वर्ष झाले होते. दरम्यान बोटीवरली कैद्यांची संख्या व त्यांना जेवू घालायची समस्या त्याला भेडसावत होती. कित्येक दिवसात ताजे अन्न त्यांना खायला मिळाले नव्हते. बोटीवरील कोळसाही संपत आलेला होता. पण बरोबर ठरलेल्या ठिकाणी शत्रूची नाकेबंदी चुकवत नर्जर व रोझ एकमेकांना भेटले. खवळत्या समुद्राची पर्वा न करता नर्जरने दोन्ही बोटी जवळ आणल्या. वादळी वाऱ्याने व तुफानी लाटांनी दोन्ही बोटींचा बाहेरचा भाग पार चेपला गेला होता. रात्रभर खपून नर्जरने नाविकांच्या मदतीने ५००० टन कोळसा बोटीवर आणला. ह्या अवधीत दोन्ही बोटींची इतकी मोडतोड झाली की वुल्फवर पाणीही शिरू लागले होते. साध्या प्रवासाला अयोग्य झालेली बोट नर्जरने भगिरथ प्रयत्नाने जर्मन किनाऱ्यावर २४ फेब्रुवारी १९१८ मध्ये आणली.

□ □ □

# मिळवा!

# 5%

**कर-मुक्त व्याज**

## सप्तवर्षीय राष्ट्रीय बचतपत्रें

ही अत्यंत चांगली गुंतवणूक आहे. त्याच्यापुढे 5 टक्के करमुक्त व्याज मिळते. परंतु तुम्ही खाली दर्शविल्याप्रमाणें अधिक प्राप्ती मिळवणाऱ्या गटांतील असाल तर तुमच्या व्याजाचा दर प्रत्यक्षात खालील प्रमाणें पडेल.

| तुमची प्राप्ती | मिळणारा व्याजाचा दर |
|---|---|
| रु. 20000 | 6.31 टक्के |
| रु. 30000 | 7.99 टक्के |
| रु. 40000 | 9.39 टक्के |
| रु. 50000 | 14.71 टक्के |

अधिक तपशीलासाठी टपाल कचेरीत चौकशी करा.

राष्ट्रीय बचत संघटना

davp 70/368



# निर्वाणीचे अस्त्र

सुभाष भिड

युद्धाचे दिवस. ५ऑगस्ट १९४५ ची रात्र. जर्मनीचा पराभव झालेला असल्याने सगळया जगाने सुटकेचा निश्वास टाकला होता. पण अजूनही अर्धी लढाई जिंकायची होती. जपान अजूनही चिवटपणे झुंज देत होता.

अमेरिकेची 'ऑगस्टा' ही क्रूझर अटलांटिक महासागरांतून पश्चिमेकडे चालली होती. इंग्लंड व रशिया या आपल्या दोस्त राष्ट्रांशी पॉटस्डॅम येथे चर्चा करून अमेरिकेचे अध्यक्ष ट्रुमन मायदेशी परतत होते. अमेरिकेच्या जिव्हाळयाच्या प्रश्नांविषयी मोठी मनमोकळी चर्चा डेकवर रंगली होती. कॉफी पितापिता जहाजाच्या डॉक्टरांनी अध्यक्षांना विचारले, 'जपानबरोबरच्या युद्धात रशियाला ओढण्याविषयी काही चर्चा पॉट्स्डॅमला झाली काय ?'

'नाही' ट्रुमन उत्तरले, 'तेथे तसे काही ठरले नाही. आणि रशियाने जरी अडवायचे ठरविले तरी आम्ही आता त्यांना भीक घालत नाही. आमच्या हाती असे शस्त्र आले आहे की आम्हाला रशियांची मुळीच गरज नाही आता.'

'हे शस्त्र फार शक्तिशाली आहे. वीस हजार टी. एन्. टी. इतकी त्याची ताकद आहे. अत्यंत गुप्तपणे ते तयार केले असून त्याची चांचणी सुद्धा यशस्वी झाली आहे. आता फक्त हेच शस्त्र या युद्धाचा शेवट करू शकेल.'

'या शस्त्राचा वापर म्हणजे इतिहासांतील सर्वांत मोठा जुगार ठरणार आहे.

आतापर्यंत त्यावर जवळजवळ २० कोटी डॉलर्स खर्च झाला आहे. अगदी थोड्याशा काळातच तुम्हाला त्याच्या परिणामकारकतेची साक्ष पटेल.'

अमेरिकेचे जपानवरील हल्ले जोर-जोरांत सुरूच होते. एकट्या जुलै महिन्यांत अमेरिकेच्या B–२९ विमानांनी जपानच्या शहरावर ४०,००० टन बाँबचा वर्षाव केला होता. २ ऑगस्ट या एकाच दिवसांत ६६,३२ टन बाँब टाकून त्यांनी नवा उच्चांक स्थापन केला.

पर्ल हार्बर, मनिला, गॉम, हवाई येथे ऑलिंपिक मोहिमेवर शेवटचा हात फिरवला जात होता. या योजनेप्रमाणे अमेरिका जपानच्या भूमीवर पहिल्यांदाच मुसंडी मारणार होती. जपानच्या दक्षिणेकडील क्यूशू टापू घेण्याविषयी ती योजना होती. एकदा तेथील बंदरे व विमानतळ ताब्यात आल्यावर टोकीयोवर अखेरचा जोरदार हल्ला करणे सोपे जाणार होते.

पराभवाची दाट छाया जपानभर पसरू लागली होती. रशिया अजूनही जपान-विरुद्ध युद्धात उतरला नव्हता. त्यामुळे शांतता तहाची बोलणी करण्यांत रशियाने मध्यस्थी व्हावे याबद्दल त्याचे मन वळविण्याची आशा अजूनही जपानला वाटत होती. याविषयी रशियाकडे सूतोवाच करून, राज्य प्रतिनिधींना रशियांत येण्याची परवानगी मिळविण्याची आज्ञा परराष्ट्रमंत्री टोगो यांनी, जपानचे रशियांतील वकील साटो यांना दिली.

साटो मुरलेले राजकारणी होते. मॉस्कोमधूनसुद्धा त्यांना आपल्या देशाचे भवितव्य दिसत होते. कसेही करून, अगदी विनाअट शरण जाऊनसुद्धा हे युद्ध थांबविण्याचा सल्ला त्यांनी आपल्या सरकारला १ जुलैलाच दिला होता. जपान आता एकाकी होता. त्याचा कोणी मित्र शिल्लक राहिला नसल्याने तो कुणाकडेही मदतीसाठी व सहानुभूतीसाठी पाहू शकत नव्हता.

साटोंचा सल्ला अगदी योग्य होता असे टोगो व पंतप्रधान सुझुकी यांचे मत होते. पण अमेरिकन विमाने व नौदल जपानच्या चिंधड्या करीत असताना जपान-मध्ये मात्र अंतर्गत धुसफुस जोरात सुरू होती. एप्रिल १९४५ मध्ये पंतप्रधानपद स्वीकारल्यापासून, सुझुकी युद्ध थांबविण्याच्या खटपटीत होते. सुप्रीम वॉर कौन्सिल-मध्ये याबाबत त्यांना टोगो व नौदल मंत्री योनाई यांचा पाठिंबा होता. पण युद्धमंत्री अनामी व भूदल व नौदल यांचे सरसेनापती यांचा युद्ध थांबविण्यास सक्त विरोध होता. अशातऱ्हेने वॉर कौन्सिलमध्ये तीन विरुद्ध तीन अशी कुंठितावस्था झाली होती.

राजे हिरोहिटो यांनासुद्धा हे युद्ध थांबवावे असे वाटत होते. त्या दृष्टीने ते

देशांतील प्रमुख राजकारण्यांचा कानोसा घेत होते. लोक जरी त्यांना देव मानत असले तरी त्यांच्या मागे मोठी राजकीय शक्ति नव्हती. एकटचा-दुकटचा पुढाऱ्या-वर ते प्रभाव पाडू शकत होते पण एखादे धोरण स्वीकारण्यास ते देशाला भाग पाडू शकत नव्हते.

अखेरीस २८ जूनला तुंबलेल्या पाण्यास वाट मिळाली. तटस्थ राष्ट्रांमार्फत शांततेच्या वाटाघाटीसाठी प्रयत्न करण्यास कौन्सिलने मान्यता दिली. ही काही शरणागती नव्हती. पण निदान शांततेकडे जाण्यासाठी पहिले पाऊल तरी उचलले गेले होते.

त्याच दिवशी वॉशिंग्टनमध्ये ट्रुमन व त्यांचे युद्ध सल्लागार यांची अगदी वेगळ्या उद्देशाने चर्चा झाली. त्यांनी ऑलिंपिक योजनेस मान्यता दिली. आता नोव्हेंबरमध्ये अमेरिका जपानच्या मातीत पाय रोवणार होती.

अखेरची झुंज देण्यासाठी दोन्ही बाजूंची जोरदार तयारी चालू असली तरी जपानप्रमाणे अमेरिकेतही शांततेसाठी हालचाली सुरू होत्या. काही अटींवर जर जपान शरण येण्यास तयार असेल तर राजे हिरोहिटोंना पदच्यूत केले जाणार नाही असे अमेरिकेने जाहीर करावे अशी सूचना अंडर सेक्रेटरी जोसेफ ग्रचू यांनी ट्रुमनना केली. यामुळे जपानची शरणागती लवकर मिळेल असे त्यांना वाटत होते. अध्यक्षांना ही कल्पना पसंत पडली. पण आपल्या दोस्तांशी चर्चा होईपर्यंत थांबण्याचे त्यांनी ठरविले.

मध्यंतरीच्या काळात जपानमध्ये चक्रे जोरात फिरू लागली. सुप्रीम वॉर कौन्सिलच्या निर्णयानंतर दुसरेच दिवशी माजी पंतप्रधान हिरोटा रशियाचे वकील जेकब मलिक यांना भेटले. शांतता वाटाघाटीत रशियाने मध्यस्थाची भूमिका घ्यावी याबद्दल त्यांनी बरीच गळ घातली. पण अबोल मलिकनी याबाबत फार उत्सुकता दाखवली नाही. जपानविरुद्ध दोस्तांचे युद्ध लवकर संपवावे अशी रशियाला घाई असायचे काहीच कारण नव्हते. जपानचे काही रशियाविरुद्ध युद्ध नव्हते. त्यामुळे फक्त अमेरिकेचे सैनिक मोठ्या प्रमाणात कामी येत होते व येणार होते. त्यामुळे हे युद्ध संपविण्याची घाई अमेरिकेला होती.

आता फारच थोडा काळ राहिला आहे याची सुझुकींना कल्पना नव्हती. निर्वा-णीच्या इशाऱ्यात राजांचा उल्लेख कुठेही करायचा नाही, असे चर्चिल व ट्रुमन यांनी ठरविले. २६ जुलैला पॉट्सडॅमहून, अमेरिका, इंग्लंड, चीन यांच्या सहीने जपानला अंतीम इशारा देण्यांत आला. त्यात जपानला इशारा देण्यात आला की जर जपान त्वरित शरण आले नाही तर ते नष्ट केल्याशिवाय दोस्त राहणार नाहीत. शरणागती नंतर राष्ट्र म्हणून जपानला जगू दिले जाईल व आपली राज्य-पद्धती कशी असावी हे ठरविण्याचे स्वातंत्र्य जपानच्या जनतेस असेल.

जपानचे मंत्रीमंडळ काळजीत पडले. कारण भविष्यकाळात राजे हिरोहिटो यांचे

काय स्थान राहणार याचा उल्लेख त्या इशाऱ्यात कुठेच नव्हात. बरीच काळ चर्चा झाल्यावर या इशाऱ्यास काहीच उत्तर न देता त्याकडे दुर्लक्ष करायचे असे मंत्री-मंडळाने ठरविले.

जपानतर्फे रशियाने तहाची मध्यस्थी करावी ही जपानची सूचना रशियाला फार संदिग्ध वाटेल असे स्टॅलीनने कळविले. रशियाचा हा रोख व पॉट्स्डॅम इशाऱ्यास उत्तर देण्यास जपानचा नकार यामुळे आपले अमोघ अस्त्र वापरल्याशिवाय हे रेंगाळलेले युद्ध थांबविणे शक्य नाही याची ट्रुमनला खात्री पटली. त्याशिवाय तरणोपाय नाही याची खात्री झाल्यावरच, जपानविरुद्ध ते अस्त्र वापरण्याच्या आज्ञेवर त्यांनी २७ जुलैला सही केली.

६ ऑगस्ट १९४५ ला जगातील पहिला अणूबाँब हिरोशिमावर टाकण्यात आला. व युद्धाचा शेवट नजरेच्या टप्प्यात आला.

६ वर्षापूर्वीच या घटनेकडे वाटचाल सुरू झाली होती. जर्मन शास्त्रज्ञांनी अणूचे विभाजन करण्यात यश मिळविल्याच्या बातम्या जानेवारी १९३९ मध्ये अमेरिकन वृत्तपत्रात झळकू लागल्या. भयानक शक्तीचे अस्त्र जर हिटलरच्या हाती लागले तर जगाचे काय होईल, याची चिंता जाणकारांना पडली. अमेरिकेत पळून आलेले एक हंगेरियन विद्वान लिओ झिलार्ड दुसऱ्या एका शास्त्रज्ञास बरोबर घेऊन अल्बर्ट आईन्स्टाईन यांना भेटले. जर्मनीने अणूशक्तित केलेल्या प्रगतीबद्दल अध्यक्ष रुझवेल्ट यांना इशारा देण्याकरिता त्यांनी आईनस्टाइनचे मन वळविले. जर्मनीने अणूशास्त्रात केलेली प्रगती, तिचे भविष्यकाळात होणारे परिणाम व त्याकरिता अमेरिकेने या स्पर्धेत उतरण्याची नितांत आवश्यकता या गोष्टी आईनस्टाईनती आपल्या पत्रात फार परिणामकारकरित्या मांडल्या होत्या. अध्यक्षांचे खाजगी सल्लागार अलेक्झांडर साक यांनी स्वतः हे पत्र, ऑगस्ट १९३९ मध्ये अध्यक्षांना नेऊन दिले.

अध्यक्ष रुझवेल्ट यांच्यावर या पत्राचा फार परिणाम झाला. पण नुकत्याच सुरू झालेल्या शस्त्रास्त्रांच्या कारखान्यात या मोठ्या व खर्चिक प्रकल्पाची भर टाकण्यास ते नाखूष होते. पण अणूशक्तिवर जो विजय मिळवील तो जगावर राज्य करील हे अध्यक्ष रुझवेल्टना पटले. याबाबत ताबडतोब पाऊले उचलली पाहिजेत हे त्यांना जाणवले. अणूशक्ति प्रकल्पाबाबतची सर्व आकडेवारी अध्यक्षांना सादर केली गेली. आता अमेरिकन सरकर अणूबाँबमध्ये रस घेऊ लागले.

तथापी, १९४१ च्या मे महिन्यापर्यंत वॉशिंग्टन येथील नॅशनल रीसर्च कमिटीत युरेनियम विभाग उघडला नव्हता. याबाबत सरकारी मदतीची चक्रे जोरात फिरेपर्यंत १९४१ ची अखेर आली. सायंटिफिक रीसर्च अँड डेव्हलपमेंट ऑफिसचे मुख्य श्री. बुश यांनी, तोपर्यंत केलेल्या प्रगतीचा अहवाल अध्यक्षांना सादर केला व

कामास अधिक गती मिळण्यासाठी जास्त प्रमाणावर शास्त्रज्ञ व पैसा पुरविण्याची विनंती केली. ६ डिसेंबरला बुशनी एक मोठी महत्त्वाकांक्षा योजना आपल्या सहकाऱ्यांना सादर केली. यालाही जरा उशीरच झाला असे म्हटले पाहिजे. कारण दुसऱ्याच दिवशी जपानने पर्ल हार्बरवर हल्ला केला व अमेरिका युद्धात उतरली.

कुणालाही फारसा संशय येऊ नये म्हणून " मॅनहटन डिस्ट्रिक्ट इंजिनिअर्स " या टोपणनावाने बॉंबच्या निर्मितीस सुरुवात झाली. १९४२ च्या उन्हाळ्यात त्यांना सर्वोच्च अग्रक्रम देण्यात आला. सप्टेंबरमध्ये ब्रिगेडियर जनरल ग्रोव्हज् यांनी या मोहिमेची सूत्रे हाती घेतली. त्यावेळी बॉंबचे कसलेही नकाशे (Blue-prints) तयार नव्हते. कसल्या प्रकारचा कच्चा माल, टूल्स वगैरे लागतील याची कल्पना नव्हती. असे असतानाही शास्त्रज्ञांच्या डोक्यात सूत्ररूपाने असलेल्या त्या अदृश्य पदार्थाचे, शास्त्रीय सिद्धांत व शास्त्रीय निष्ठांचे सहाय्याने, एका नव्या शक्तिशाली शस्त्रात रूपांतर करण्यास ते सिद्ध झाले. हे साध्य करण्यासाठी, सक्तीने लवकर भरती केल्याप्रमाणे त्यांनी उद्योग क्षेत्रातील मोठ-मोठे विद्वान दावणीला बांधले. कुठलीही पक्की योजना हाती नसतानादेखील अमेरिकन तिजोरीतून जरूर लागेल तशा भरमसाठ रकमा त्यांना मिळत गेल्या. यानंतर फक्त अमेरिकेतच घडू शकेल असा चमत्कार घडला. ज्या देशाने अनेक औद्योगिक विक्रम केले होते असा हा देश, मानवाने तोपर्यंत न केलेला शास्त्रीय-औद्योगिक-लष्करी प्रकल्प उभारण्यास सिद्ध झाला.

सुरुवातीस जरा अडखळत–अडखळत मॅनहटन प्रकल्पाचे कार्य सुरू झाले. यू–२३५ वेगळे करण्याच्या तीन पद्धती होत्या. पण त्यापैकी कोणती सर्वोत्तम आहे याची कुणालाच कल्पना नसल्याने त्या तिन्ही पद्धतीनी काम सुरू झाले. या सर्व पद्धती अत्यंत खर्चिक होत्या. त्यांच्यातून नवनवीन प्रश्न निर्माण होत गेले. १९४५ च्या उन्हाळ्यात तीन बॉंबना पुरेल इतके सुमारे १०० पौंड स्फोटक द्रव्य निर्माण करण्यात आले. यावेळी कामाला अगदी सर्वोच्च गती मिळाली होती. या प्रकल्पावर व त्याच्या सहाय्यक उद्योगधंद्यात ५,३९,००० नागरिक गुंतले होते.

मॅनहटनमध्ये सर्व शास्त्रज्ञ एकत्र येऊन एकदिलाने काम करीत होते. रॉबर्ट ओपनहेमर यांच्या सहाय्यास इंग्लंडमधील शास्त्रज्ञ व इटाली, जर्मनी, हंगेरी येथील निर्वासीत शास्त्रज्ञ आले होते. आपल्याकडील सरकारी खात्याच्या अगदी उलट परिस्थिती इथे होती. काही विभागात कारकून वगैरेंच्यापेक्षा शास्त्रज्ञांची संख्या बरीच जास्त होती. तर साध्या–साध्या किरकोळ कामासाठी नोबेल पारितोषिक विजेते आपला मान बाजूला ठेवून खपत होते.

स्थापनेनंतर काही महिन्यातच मॅनहटन प्रकल्पाने पहिला ऐतिहासिक विजय मिळविला. २ डिसेंबर १९४२ च्या दुपारी पहिली नियंत्रित साखळी प्रतिक्रिया (Controlled Chain Reaction) निर्माण करण्यात शास्त्रज्ञांना यश आले.

यांची साधने अगदी ओबडधोबड होती. पण त्यांची खात्री पटली की त्यांनी निर्माण केलेल्या फिजन प्रोसेसमधून प्रचंड ताकदीचे शस्त्र निर्माण होईल.

अजूनही सर्व अडथळे दूर झाले नव्हते. एक पौंड यू–२३५ पासून ९००० टन टी. एन. टी. इतकी शक्ती निर्माण होईल असा शास्त्रज्ञांचा हिशेब होता. पण हे केवळ एक पौंड द्रव्य साखळी प्रतिक्रिया चालू ठेवण्यास पुरेसे नव्हते. स्फोट होण्यापूर्वी काही प्रमाणात दुसरे द्रव्य–ज्याला ' क्रिटीकल मास ' असे म्हणतात–आवश्यक होते. पण हे द्रव्य किती प्रमाणात हवे याची काहीच माहिती नव्हती. स्फोटाच्या नेमक्या क्षणापर्यंत या क्रिटीकल मासचा काहीही परिणाम होऊ नये म्हणून तोपर्यंत त्याची घटकद्रव्ये दूर–दूर ठेवणे आवश्यक होते. या सर्व संशोधनासाठी मॅनहटन प्रकल्पाने न्यू मेक्सिकोतील लॉस अलमॉस येथे प्रयोगशाळा सुरू केली. रॉबर्ट ओपनहेमर यांची सायंटिफिक डायरेक्टर म्हणून नेमणूक झाली.

गुप्तता राखण्यासाठी येथे अत्यंत कठोर सुरक्षितता उपाय योजले होते. सर्वांची पत्रे तपासली जात होती. टेलीफोन टॅप करीत होते. सर्वांच्यावर अत्यंत बारकाईने पाळत ठेवली जात होती. यामुळे कुठल्याही जर्मन अथवा जपानी गुप्तचराला महत्वाची माहिती मिळू शकली नाही. इतकेच काय, तर आपल्या देशात अणूबाँब तयार करण्याची खटपट चालली आहे याची बहुसंख्य अमेरिकनांना कल्पनाही नव्हती.

अणूबाँब नेमका शत्रूच्या लक्ष्यावरच पडावा म्हणून १५०० अधिकारी व सैनिक आणून ' ५०९ काम्पोझिट ग्रुप ' स्थापन करण्यात आला. अवघड कसोट्या लावून वैमानिकांची फार काळजीपूर्वक निवड करण्यात आली. कर्नल पॉल टिबेटस् यांची या ग्रुपचे प्रमुख म्हणून निवड झाली. अणू विभाजनाची गुपिते व त्याचे लष्करी दृष्ट्या महत्व त्यांना सांगण्यात आले. अणूबाँब तयार होऊन तो शत्रूवर टाकण्याचा प्रसंग आलाच तर पहिला अणूबाँब नेणाऱ्या विमानाचे पायलट टिबेटस्च असतील असे त्यांना आश्वासन देण्यात आले.

हा ५०९ ग्रुप सर्वांच्यापेक्षा फार वेगळा होता. त्यावेळच्या प्रचलित पद्धतीपेक्षा अत्यंत वेगळ्या पद्धतीने सराव करीत असे. सरावासाठी व्हेंडोवरची निवड करण्यात आली. येथील रुंद, निष्पर्ण, सपाट वाळवंट व स्वच्छ आकाश या गोष्टी त्यांच्या त्या अनोख्या सरावास फार सोयीच्या होत्या. तोपर्यंत कुणीही कुठेही पाहिली नसतील अशी उड्डाणे येथे होत होती. ३०,००० फूट उंचीवरून बाँबफेक करण्याचा सतत सराव केला जात होता. प्रत्येक विमान १०,००० पौंडी फक्त एकच बाँब टाकी. बाँब टाकल्याबरोबर गर्रकन विमान वळविण्यावर फार जोर होता. इतक्या उंचीवरून अचूक लक्ष्यवेध करण्याला फार महत्त्व होते. कारण उघड होते. लाखो डॉलर्स किमतीचा फक्त एकच बाँब विमानात असणार होता. अशा वेळी लक्ष्य चुकणे परवडणारे नव्हते.

अणूबाँब निर्मितीत जरासुद्धा दिरंगाई चालली नव्हती. पहिला अणूबाँब १ ऑगस्ट १९४५ च्या सुमारास तयार होईल असे जनरल ग्रोव्हजनी सरसेनानी जॉर्ज मार्शल यांना ३०–१२–४४ ला कळविले. पण एव्हाना नाझी जर्मनीचा अंतकाळ जवळ येत चालला असल्याने जर्मनीविरुद्ध तो वापरणे फार उशीर होणार होते. त्यामुळे पॅसिफिक नेव्हल कमांडला तयार राहण्याची आज्ञा द्यावी असा सल्ला ग्रोव्हजनी दिला. कारण जपानला पोचण्यासाठी ५०९ ग्रुपला तळ हवा होता.

अमेरिकेच्या ताब्यातील मारिआना येथील तिनियन हे बेट ५०१ ग्रूपचा तळ म्हणून निवडले गेले. तेथील ५ मैल रुंदीचा व ११ मैल लांबीचा पट्टा धावपट्टी-साठी सुयोग्य होता. हे बेट लहान असल्याने गुप्ततेच्या दृष्टीने सोयीचे होते. शिवाय जपानने तेथे चांगल्या रस्त्यांचे जाळे निर्माण केले होते.

एप्रिलच्या अखेरीस टिबेट्स्च्या सहकाऱ्यांनी तिबियनकडे उड्डाण केले. त्याच्या-कडे बी-२९ जातीची १५ बाँबर विमाने होती. लगेच ५०९-ग्रुप स्थानिक चर्चेचा विषय झाला. सर्वांना या विमानांच्याविषयी फार कुतुहल होते. त्यांनी सर्वांच्या-बरोबर कुठल्याही हवाई हल्ल्यात भाग घेतला नाही. उलट एक-एकटी उड्डाणे करून जपानच्या ताब्यातील एखाद्या बेटावर बाँब टाकीत. जपानच्या एखाद्या शहरावर प्रत्येकी केवळ एकच बाँब टाकण्यासाठी ते कधी-कधी ३००-३०० मैलांची दौड मारत.

अणूबाँब तयार करण्याचे ज. ग्रोव्हन यांचे वेळापत्रक पुष्कळसे बरोबर ठरले. त्याची चाचणी घेण्यासाठी न्यू मेक्सिकोतील रुक्ष वाळवंटी प्रदेशाची निवड केली. वेळ होती १६ जुलै १९४५, पहाटे ५-३०.

हजारो सूर्यांच्या इतक्या दैदीप्यमान तेजाने अणुयुगाची कवाडे खोलली गेली. ज्यांनी परवानगीविना त्याकडे पाहिले त्यांना तात्पुरते अंधत्व आले. जांभळी, नारिंगी किनार असलेला तेजाचा प्रचंड लोळ काही मैल पसरवून आकाशात गेला. पृथ्वी हादरली. उष्ण हवेचा झोत या प्रदेशात घुसला. पांढऱ्या धुराचा स्तंभ छत्रीचा आकार घेत सरळ ४०,००० फूट उंच गेला. ज्या मनोऱ्यावर हा बाँब टाकला होता तो केव्हाच वितळून गेला. कित्येक मैल दूर एकआंधळी ओरडत होती– "मला प्रकाश दिसला !"

कुणाला संशय येऊ नये म्हणून या स्फोटाचे एक खोटे स्पष्टीकरण तयार ठेवले होते. अल्बुकर्क येथे ते वार्ताहारांना देण्यात आले. "न्यू मेक्सिकोच्या दूरच्या भागात दारूगोळ्याच्या साठ्याचा प्रचंड स्फोट आज पहाटे झाला. येथून २३५ मैलावर असलेल्या गॅलप येथेही याचा प्रकाश व धक्का जाणवला असे कळते. स्फोटाचे कारण समजले नाही. चौकशीचा आदेश देण्यात आला आहे." चर्चिल यांना संदेश पाठविण्यात आला. "बाळे सुखरूप जन्मली" (Babies satisfactorily born)

शास्त्रज्ञांच्या अपेक्षेपलीकडे हा स्फोट यशस्वी झाला होता. आपल्या विजयाने

ती मंत्रमुग्ध झाले. २०,००० टी एन्. टी. इतकी ताकद या बाँबने निर्माण केली होती.

मॅनहटन येथील संशोधन फुकट जाईल अशी आशा काही शास्त्रज्ञांना होती पण एकदा चाचणी यशस्वी झाल्यावर त्याचा युद्धात वापर करू नये म्हणून त्यांनी सरकारचे मन वळविण्याचा प्रयत्न केले. बऱ्याच अर्ज विनंत्या केल्या. पण साध्या बाँबमध्ये नाही अशी कोणती तरी भयानक अनैतिकता या अणूबाँबमध्ये आहे हे सेनाधिकाऱ्यांना पटेना.

१२ एप्रिल १९४५ ला अध्यक्ष रुझवेल्ट यांचा अचानक देहांत झाला. त्यांची जागा हॅरी ट्रूमन यांनी घेतली. त्यांनी अण्विक धोरणाच्या काही बाजूंचा विचार करण्यासाठी एक समिती नेमली. या कमिटीवर ८ सभासद होते. ४ शास्त्रज्ञांच्या एका तुकडीची त्यांचे सल्लागार म्हणून नेमणूक झाली. कुठलीही पूर्व कल्पना न देता जपानविरुद्ध लष्करात लवकर अणूबाँबचा वापर करावा असा निर्णय या कमिटीने दिला. अध्यक्ष ट्रूमन स्वतंत्ररित्याही याच निष्कर्षाला आले होते. त्यामुळे जपानने जर लवकरात लवकर शरणागती पत्करली नाही तर त्याविरुद्ध अणूबाँब वापरला जाईल हे जवळ जवळ निश्चित होते.

जपानची शरणागती लवकर मिळावी, म्हणून अणूबाँबच्या भयानक संहारक शक्तीचा जास्तीत जास्त ठसा उमटविणे आवश्यक होते. त्यासाठी ज्या शहरावर तोपर्यंत फारसे बाँब हल्ले झाले नव्हते, त्यांच्यावर अणूबाँब टाकावा असे ठरले. आता अशी फारच थोडी शहरे जपानमध्ये उरली होती. विचार करण्यासाठी नावांची जी यादी पाठविली होती त्यात फक्त चारच शहरांची नावे होती. कोकुरा, निगाटा, हिरोशिमा आणि क्योटो. अगदी शेवटच्या क्षणी नागासकीचा अंतर्भाव केला गेला. सहाजिकच सरतेशेवटी पहिले लक्ष्य म्हणून एकच नाव हिरोशिमा उरले. ६ ऑगस्ट १९४५ ला पहिला अणूबाँब टाकला जायचा होता. लक्ष्य होते. —हिरोशिमा

[ लेखांक दोन : पुढील अंकी ]


# शिलंगणाचं सोनं

**आवृत्ती : तिसरी**

**ब. मो. पुरंदरे**

**किंमत : तीन रुपये**

**राजहंस प्रकाशन**

## महाराष्ट्र संघाची कर्णधार

# चित्रा नाबर

पूर्वीच्या काळी अश्वमेध यज्ञ होत. कोठेही पराभव न घेता साऱ्या प्रदेशावर विजयी वर्चस्व स्थापन केल्यावर या विजयाची सांगता होई. नवयुग क्रीडा मंडळाच्या कर्णधार कु. चित्रा नाबर यांच्या नेतृत्वाखालील त्यांच्या व संघाच्या पराक्रमाला वरील उपमाच साजेशी दिसेल. मागील वर्षी नवयुग क्रीडा मंडळाने भारतातील नऊ नामवंत क्रीडास्पर्धांत भाग घेतला आणि त्या सर्व सामन्यात हा संघ अजिक्य ठरला. या विजयातील सिंहाचा वाटा संघनायिका आणि सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून चित्रा नाबर यांच्याकडे जातो. मागील वर्षी भारतीय स्पर्धेत अजिक्य ठरलेल्या महाराष्ट्र राज्य संघाच्या त्या उपकर्णधार होत्या आणि यंदा दिल्ली येथे ३ ते ७ फेब्रुवारी मध्ये होणाऱ्या अखिल भारतीय स्पर्धेत त्या महाराष्ट्र राज्याचे नेतृत्व करतील.

१९६५ सालापासून किंग जॉर्ज हायस्कूलमधून खेळाचा प्रारंभ केल्यावर अवघ्या पांच वर्षात त्यांनी बजावलेली कामगिरी हेवा वाटण्यासारखी आहे. रुईया कॉलेजचा संघ त्यांच्या नेतृत्वाखाली मुंबई विद्यापीठात सतत तीन वर्षे अजिक्य ठरला आहे. १९६९ साली त्यांनी नेतृत्व केलेल्या मुंबई विद्यापीठाच्या संघाने अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेत मानाचे पान मिळविले होते. तिरोडकर ट्रॉफी अथवा दादोबा गावंड शील्डचे सामने अशा स्वरुपाच्या पहिल्या दर्जाच्या स्पर्धात आपला संघ सतत पहिला ठेवण्याचा विक्रम त्यांनी सतत चार वर्षे केला आहे. महाराष्ट्र राज्य अजिक्य-पदाच्या आणि संघ निवडण्याच्या चाचणी सामन्यात १९६७ पासून अजिक्य ठरलल्या मुंबई जिल्ह्याच्या यशात त्यांचा वाटा किती महत्त्वाचा आहे हे ते सामने जवळून पहाणारा कोणताही क्रीडारसिक चटकन् सांगू शकेल. महाराष्ट्र राज्याच्या प्रातिनिधीक संघातून बडोदा, इंदूर, नागपूर आणि मुंबई येथील. अ. भा. स्पर्धा त्यांनी गाजविल्या आहेत.

त्यांचे सफाईदार क्रीडाकौशल्य स्वतःच्या उंचीचा सुयोग्यपणे करून घेतलेला उपयोग, हूल देऊन, झाप घेऊन आणि इतर विविध प्रकारे गडी बाद करण्याचे कसब

हे सारे पहिल्या वर्गाचे आहे. पण या साऱ्यापेक्षा त्यांच्या बेडर आक्रमक वृत्तीला मी सर्वात अधिक गुण देतो. भलेभले पुरुष खेळाडू सध्या कातडीबचावू बायकी खेळ खेळत असताना एका स्त्री खेळाडूने केवढ्याही जबरदस्त प्रतिस्पर्ध्याशी नेहमीच प्रबलपणे आणि खऱ्याखुऱ्या खेळाडू वृत्तीने झुंज देऊन खेळाचा आणि संघाचा गौरव वाढवावा ही खरोखरच पुरुष खेळाडूंना आदर्शवत गोष्ट ठरावी. अनेक सामन्यातून मध्यरक्षकाची आणि कोपरारक्षकाची कामगिरीही त्यांनी यशस्वीपणे सांभाळली आहे.

अ. भा. वि. प. तर्फे आयोजित करण्यात आलेल्या गॅलपपोलमध्ये १९६८, १९६९ साली सर्वोत्कृष्ट महिला खेळाडू म्हणून त्यांची निवड झाली होती. आकाशवाणीवरून कबड्डी खेळाविषयी माहिती सांगण्याची व मुलाखात देण्याची संधीही त्यांना दोनदा प्राप्त झाली आहे. महाराष्ट्रातील आणि भारतातील सर्व मैदाने गाजविणाऱ्या या विक्रमी महिलेची स्वतःच्या नेतृत्वाखालील दिल्लीवरची स्वारी यशस्वी होईल यात मला तरी शंका नाही.

## महाराष्ट्र राज्याचा कर्णधार—वसंत ढवण

कसोटी सामन्याचे नेतृत्व चंदू बोर्डेकडे आले असते तर तो जसा अनपेक्षित धक्का बसला असता तसा धक्का वसंत ढवणच्या खांद्यावर महाराष्ट्र राज्याच्या नेतृत्वाची धुरा दिली गेल्यावर अनेकांना बसला. गेली तीन वर्षे महाराष्ट्र राज्याच्या संघातही ज्याची निवड होऊ शकली नाही तो यंदा एकदम संघनायक कसा, असा प्रश्न अनेक मुखांनी विचारला गेला.

हे विचारले जात असताना वसंत ढवणच्या कबड्डीतील कर्तृत्वाची योग्य नोंद घेणे आवश्यक आहे. कारण अ. भा. स्पर्धांच्या अठरा वर्षाच्या इतिहासात अजिक्य पदाची हॅट्ट्रीक करण्याची संधी प्रथमच महाराष्ट्राला लाभत आहे आणि संघनायक म्हणून या विजयाचा शिल्पकार त्याला व्हावयाचे आहे.

१९५० साली मुंबईच्या श्रीराम संघात दाखल झालेला वसंत ढवण गेले सतत वीस वर्षे कबड्डीचे मैदान आपल्या कर्तृत्वाने गाजवीत आहे. श्रीराम संघ व मुंबईतील सर्वात अधिक बक्षिसे मिळविलेला संघ आणि त्या यशात ढवणचा वाटा नेहमीच महत्त्वाचा राहत आहे. मुंबईतील तीन स्पर्धात एकाच दिवशी अजिक्यपद मिळविणे, सोलापूरच्या जय भवानीच्या सामन्यात सतत तीन वर्षे सुवर्णढाल जिकून हॅट्ट्रीक करणे अथवा एका वर्षात चौदा ठिकाणची अजिक्यपदे मिळविणे हे सर्व पराक्रम श्रीराम संघाला वसंत ढवणच्या दमदार खेळामुळेच शक्य झाले.

फिनिक्स मिल्समध्ये कामाला असताना मिल नोकर संघाला महाराष्ट्रातून अनेक



महाराष्ट्र राज्य कबड्डी संघाचा कर्णधार
**वसंत ढवण**

अनेक ठिकाणी जी अजिक्यपदे मिळाली ती वसंत मुळेच. पुढे लक्ष्मीरतन या कारखान्यात नोकरीला लागल्यावर भारतीय कबड्डीचे विंबल्डन असलेल्या भुईर सुवर्ण चषकाच्या स्पर्धा जिंकून तो चषक आपल्या संघाला मिळवून देण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. गेले दोन वर्षे तो महेंद्र आणि महेंद्रमध्ये नोकरी करत आहे. गेल्या वर्षी गुंटुर (आंध्र) या ठिकाणी अ. भा. स्पर्धेत अथवा यंदा पुणे येथील राणाप्रताप संघाच्या दर्जेदार सामन्यात महेंद्र संघाने जी अजिक्यपदे मिळविली त्याला वसंतचे प्रभावी नेतृत्व आणि चतुरस्त्र खेळच कारणीभूत होता.

डावा कोपरा तो अत्यंत कौशल्याने सांभाळतो. उत्कृष्ट कोपरारक्षकाला लागणारे सर्व गुण–चवडा आणि लावणी पक्कड, सूर मारणे, पाठ पकडणे, पाठलाग करणे, ब्लॉक करणे त्याच्यामध्ये आहेत. त्याची चढाई वेगवान असते. खालचा पाय मारणे वा लाथ मारणे आणि कच्चे दुवे अचूक हेरून झापेने गडी मारणे ही त्याची खास कौशल्ये गेल्या वर्षी महाराष्ट्रातील फक्त आठ निवडक संघाचे जे सामने मिरजेला झाले त्यामध्ये विजयबजरंगच्या बलाढ्य संघाशी खेळताना त्यानी ज्या तडफदारपणे झापेनं खेळाडू टिपून आपल्या संघाकडे विजयश्री खेचून आणली तो खेळ कधीच विसरणे शक्य नाही.

१९६० पासून १९६६ पर्यंत अमृतसर, जबलपूर, अलाहाबाद, कोल्हापूर, हैद्राबाद, वडोदा या ठिकाणी झालेल्या अखिल भारतीय सामन्यात तो महाराष्ट्र राज्य संघातून सतत खेळला आहे. त्याचे अनुभवी आणि सयंमित नेतृत्व हॅट्ट्रीक पुरी करण्याचे महाराष्ट्राचे फार वर्षाचे स्वप्न साकार करील अशी आशा करुया.

◻ ◻ ◻

## सुरिंदर शर्मा, दाभोळात

पृष्ठ १४ वरून

पोचलो. शहर आग्रा. गावातून चाललोय. लोकांची उत्सुकता, अपेक्षा. गावापासून दूर आलोय. आतापर्यंत सर्वजण एकमेकांशी बोलत होते. बडबड चालली होती. पण...पण आता निःस्तब्ध शांतता होती. कुणी कुणाशी बोलत नव्हतं. का ? कशा-साठी ? काय झालं होतं ?

७–३० झालेत संध्याकाळचे. जवळ आलोय. आापापली वाहनं उभी केलीत, बिस्तरे खोललेत, सतरंज्या पसरल्या, हातपाय धुऊन घेतलेत, मूकपणानं सारं काही चाललंय. अन् मग आम्ही पाचीजण निघालोय. अंतर थोडंच उरलंय. झाडांची पलटण आहे. सुरूंची. सुगंधित फुलं फुललीत. छोटासा तलाव आहे. पूर्वेकडून चंद्र-बिंब वर येतंय. सर्वत्र रुपेरी चांदण्याची बरसात होतीय. अन् आम्ही पाची जण एकमेकांपासून खूप दूरचे. नव्हे दूर देशांचे. धर्म अलग. भाषा दुसरी. वेष दुसरा. संस्कार वेगळे. पण जात होतो एका ठिकाणी. जिथं कुठलाही भेद नव्हता. जिथं जात एकच. एकच भावना स्पर्श करीत होती मनाला. हो ! पोचलो. आलो. पाय धुतले अन् पाहिलं समोर. पाठीमागून चंद्र वर्षाव करीत होता शीतल चांदण्यांचा अन् समोर होता अमोल प्रीतीचा ताजमहाल. दोन जीवांची भेट झालेली जागा. चिरमीलनाचं स्थान. प्रीतीच्या दुनियेत जात नसते. भेद नसतो. तो ताजमहाल–!

पाहिलं. आत गेलो. भक्तिभावानं मुमताज-शाहजहानच्या अमर प्रीतीचं दर्शन घेतलं. मन भारावलं. शब्द फुटेनात. कलाकुसरीचं ते वैभव, प्रीतीचा तो महाल. ते शिल्प पाहताना वेळ होती रात्रीची. मन हरवलं होतं. शरीर दमलं होतं पण कल्पना बहरत होत्या. सांगाती होते चार जर्मन तरुण-तरुणी, तेही भारावले. कोमल अशा त्या शिल्पाला वंदन करून परतलो. कोणी कुणाशी बोलत नव्हतो. कारण बोलण्या-सारखे शब्दच राहिले नव्हते. जे शब्दांनी सांगता येत नव्हतं ते नेत्रातून दिसत होतं.

जेवलो. जेवण कसलं–गोपालकालाच होता तो. माझं भारतीय जेवण नि त्या जर्मन तरुणांचं कॅन्ड फूड. साऱ्यांचा संगम झाला होता. जेवणाचा अन् भावनांचा पण. ६००० मैलांवरचे ते जर्मन तरुण-तरुणी इतक्या दुरून आले होते भारत पाहायला. त्यांना होते भारताचं आकर्षण नि मी होतो भारतीय. निघालो होतो आपलाच एक प्रान्त पाहायला, नाव त्याचं महाराष्ट्र ! मोठं विलक्षण नाव. महान राष्ट्र. दगडाधोंड्यांचा, सन्तवीरांचा, बुद्धिमंतांचा अन् असाच एक प्रवास करायचं ठरविलं होतं, महाराष्ट्राचा. पाह्यचा. लोक कसे, भाषा कशी, देश कसा, बोलतात कसे. हा अभ्यास, अन् तोही एका सखीबरोबर. हो ! हो ! ! चमकू नका असे. लोकसभासदनाजवळ एका सखीबरोबर होतो ना मी, तीच माझी सखी. म्हणजे आपली माझी दुचाकी हो. तिच्यावरूनच हा माझा प्रवास चाललाय ! ही आहे महाराष्ट्राची अभ्यासयात्रा ! ! ही आहे भटकन्ती ! ! ! चित्रविचित्र अनुभवांची. मधुर स्मृतींची. यादे–ए–वतनकी. त्याचीच ही एक पहली झलक ! ◻ ◻ ◻

पृष्ठ ५ वरून

मजुराला त्यांचे अन्नधान्याची, औषधपाण्याची, व कपड्यालत्याची पुरवठा करण्याची जबाबदारी भारतीय सरकारची राहील. जो नागरीक काश्मीरमध्ये अन्न खाईल त्याच दर्जाचे अन्न भारतातील इतर कोठल्याही प्रदेशातील नागरीक त्या त्या भौगोलिक गरजेनुसार खाईल. कोठलाही भेदभाव त्यामध्ये राहणार नाही.

५. सर्व देशभर शनिवार आणि रविवार हे पूर्ण विश्रांतीचे दिवस राहतील व प्रत्येकाला फक्त एक महिना विश्रांतीसाठी रजा मिळेल. अन्य धार्मिक सण सुट्ट्या कोठल्याही प्रकारच्या मिळणार नाहीत.

६. सर्व होणारे उत्पादन राष्ट्राचे मालकीचे राहील. त्यावर कोणाचीही वैयक्तिक मालकी राहणार नाही.

७. सर्व कामगार पुढारी, पोटभरू देशभक्त, विधीमंडळ सदस्य, संसद सदस्य इत्यादि पदे त्वरित नाहीशी करून देशामध्ये एकतंत्री कारभार किमान दहा वर्षे चालविला जाईल. सर्व विधानसभा आणि परिषदा, तसेच लोकसभा त्वरीत बरखास्त करण्यात येईल व या संस्था किमान दहा वर्षेपर्यंत रद्द समजल्या जातील.

८. भारतीय राजधानीत फक्त राष्ट्रपतींकडून कारभार पाहिला जाईल व त्यांना एक देशाचा कारभार पाहण्याचेसाठी एक सल्लागार मंडळ राहील. या सल्लागार मंडळीत त्या त्या विषयातील तज्ञ व्यक्तीच असतील आणि या व्यक्तीनी सामान्य माणसाचा जेणेकरून फायदा होईल अशाच प्रकारे त्या त्या क्षेत्रात सल्ला देऊन अंमलबजावणी करावयाची आहे.

९. सर्वत्र देशभर १० ते १५ प्रकारच्या वेतनश्रेणी राहतील. अन्य भेदाभेद आर्थिक बाबतीत राहणार नाही.

१०. सर्व परदेशातून घेतलेली कर्जे प्रथम फेडली जातील व त्यानंतर कर्ज काढताना दहा वेळा आर्थिक सल्लागार विचार करतील.

११. उत्पादन क्षमता वाढविण्याची पराकष्ठा केली जाईल व देश स्वतःचे पायावर कसा प्रत्येक बाबतीत उभा राहील याकडे सर्व लक्ष केंद्रीत राहील.

१२. सर्व कारकुनी खात्यातून ३० वर्षाचे आतील तरुणांना काम करण्यास मनाई केली जाईल व अशा ठिकाणी फक्त स्त्रीवर्ग आणि ४० वर्षावरील पुरुषवर्ग काम करील.

१३ हा तरुण वर्ग ज्या ज्या ठिकाणी उत्पादन वाढीस वाव आहे अशा ठिकाणी काम करील.

□

# माझा जाहीरनामा

**प्रभाकर गोखले, कोल्हापूर**

श्री. श्री. जं. चा जाहीरनामा प्रसिद्ध करून आपण एकाप्रकारे आमच्यासारख्या, राजकारणामुळे होणाऱ्या परिणामांशिवाय इतर प्रकारे राजकारणाशी संबंध नसलेल्या लोकांच्या विचारांना प्रसिद्धीची वाट मोकळी केलीत, याबद्दल आपले अभिनंदन !

माझ्या जाहीरनाम्यास जाहीरनामा न म्हणता, माझ्या भावी सरकारकडूनच्या अपेक्षा असे म्हणणे मी जास्त पसंत करीन. माझ्या, माझ्या नवीन सरकारबद्दल ढोबळ मानाने खालील अपेक्षा आहेत.

१. सरकार, मग ते कुठल्याही पक्षाचे असो, आयाराम–गयारामला, म्हणजेच प्रर्यायाने खासदाराच्या खरेदी विक्रीस वाव राहू नये म्हणून, कोणाही खासदारास पक्ष (म्हणजेच बाजू) बदलावयाचा असेल तर त्याने आपल्या खासदारकीचा राजीनामा द्यावा व मग पक्ष बदलावा. लोकहिताचे दृष्टीने व विचार बदलल्यामुळे पक्षांतर होऊ शकते असे गृहीत धरावयास हरकत नाही. तसेच त्याच खासदारास अर्थातच त्याच अथवा इतर मतदारसंघातून फेरनिवडणुकीस उभे राहण्यास मज्जाव नसावा.

अशा स्वरूपाचा कायदा, स्थिर सरकार निदान केंद्रात तरी, अस्तित्वात असावे म्हणून आवश्यक ठरतो. तो नव्या सरकारने करावा.

२. सरकारने केलेले करार सरकारने पाळलेच पाहिजेत. आज 'समाजवादासाठी' संस्थानिकांचे तनखे रद्द होतात म्हणजे उद्या या तथाकथित 'समाजवादासाठीच' सरकारी रोखे ज्यांना एकप्रकारचा करार म्हणता येईल. तेसुद्धा एकतर्फी रद्द होऊ शकतील. हे केवळ एक उदाहरण म्हणून देत आहे. (मला व्यक्तिशः संस्थानिकांचे प्रेम नाही. पण कोणाही सद्गृहस्थांनी केलेल्या कराराची शुचिता अबाधित ठेवणे आवश्यक ठरते. (Gentleman's Word)

३. काळा बाजार, साठेबाजी आणि सट्टेबाजी कोण करतो यांची माहिती सरकारकडे असते. अशा लोकांवर आरोप सिद्ध करून, अतिशय कडक शासन त्यांना द्यावे.

४. कुठल्या गोष्टीचा बाजारभाव केव्हा काय होईल हे सांगता येत नाही. पोलादाचा भाव गेल्या सुमारे २–३ वर्षात ४५ ते ५० टक्यांनी वाढला आहे. हा भाव रोज बदलत असतो. अशा गोष्टींना आळा घालावा व स्थिर भावपातळी राखावी.

५. नियंत्रणे कमी करावी म्हणजे कृत्रीम टंचाई नष्ट होईल. याचे एकच उदाहरण म्हणजे सिमेंट. ४–५ वर्षापूर्वी सिमेंटचा काळचा बाजारचा भाव १६ ते १७

रुपये गोणी असा होता. आज खुल्या बाजारात भरपूर सिमेंट १२ रु. गोणी याप्रमाणे उपलब्ध आहे. साखरेबद्दलही असेच म्हणता येईल.

६. काही वेळा नुकसान होईल असे गृहीत धरूनही भारतीय तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ यांनाच कोणत्याही उद्योगाची उभारणी करण्याचे काम द्यावे. म्हणजेच भारतीय तज्ञ डावे असतात ही तर्कदुष्ट विचारसरणी सोडून द्यावी व आपल्या माणसांना वाव द्यावा.

७. राष्ट्राचे नागरिकात विजिगिषु वृत्ती, राष्ट्रीय अस्मितेची जागृती निर्माण होईल व न्यूनगंडाची हकालपट्टी होईल अशी धोरणे सरकारने आखावी त्याची तपशीलवार व काटेकोर अंमलबजावणी करावी. ◻

## भ्रष्ट सत्तेच्या कोंडाळ्यातून आम्ही भारतीय बाहेर पडण्यासाठी–

**आप्पासाहेब आडव्यापा गुरव**

१९४७ सालापासून या देशावर कॉंग्रेसचे अधिराज्य चालू आहे. या काळात कॉंग्रेसने आम्हा भारतवासीयांना खालील गोष्टी दिल्या–

१. भ्रष्ट कारभार.
२. कोटयावधींची बेकारी.
३. अब्जावधींचे परराष्ट्रीय कर्ज.
४. सामान्य भारतीयांचा स्वाभिमान खुडून त्यांना नादान करणे.
५. सुवर्णभूमीचे स्मशानभूमीत रूपांतर करण्याचा प्रयत्न.
६. तत्त्वासाठी सत्ता वापरण्याऐवजी सत्तेसाठी तत्त्वांचा वापर.
७. पत, पात्रता व पवित्रता यांचा होम.
८. सार्वत्रिक ढोंगाची निर्मिती.

सर्वसामान्य माणसे आपण व आपले व्यवसाय-उद्योग सांभाळत समाधानाने जीवन जगणे एवढाच किमान व कमाल हेतू ठेवून जगतात. हा सर्वसामान्य समाज राजकारण, सत्ता वगैरे बाबतीत पूर्ण उदासीन असतो. कारण त्यांच्या बुद्धीची व महत्त्वाकांक्षेची झेप वरील बाबीपर्यंत पोहचूच शकत नाही. त्यांना हवे असते सुख व समाधान, आणि नेमके आम्हा भारतीयांच्या बाबतीत याच्या उलट गेल्या बावीस वर्षांत घडवले गेले आहे. सुख व समाधानांचा चुरा झालाय. कॉंग्रेसी धेंडाच्या व पुंडाच्या असुरी सामर्थ्याने व सत्तेने सर्वसामान्य माणसांचे जीवन चावडून, भंगून गेले आहे. जीवनाच्या सर्व क्षेत्रात एक भयानक भकासपणा निर्माण

होऊ पहात आहे. अशास्त्रीय महागाई, कमालीचा भ्रष्टाचार आणि माणसाचे हक्क आणि खाजगी जीवन ग्रासू-पहाणारे कायदे, यामुळे सर्व जनता हवालदील होऊन गेली आहे. अशा या सर्व बिकट व भयावह परिस्थितीतून योग्य बदल करण्याची शक्ती व वृत्ती ज्या संघटनेत आहे, त्या संघटनेलाच सत्तारूढ करण्यासाठी या आगामी मध्यावधी निवडणुकीत जोराने व जोमाने मतदान करण्यात यावे अशी एक मध्यमवर्गीय म्हणून माझी आग्रहाची सूचना नव्हे विनंती आहे.

आणि अशा मतदानासाठी भारतीय जनसंघ ही संघटना मला योग्य वाटते. भारतीय परंपरा, भारतीय दृष्टी, स्वाभिमान, भारतीय अस्मिता, भारतीय तत्त्वज्ञान व राजनीती याचा अभिमान बाळगणारा आणि हे सर्व पुर्नजिवित करू पहाणारा भारतीय जनसंघच या सर्व परिस्थितीतून भारताला निभावून नेऊ शकेल. एखाद्या पक्षाचा प्रचार या दृष्टिकोनातून मी हे लिहीत नाही. भारतीय जनसंघाशिवाय इतर संघटनांकडे मतदारांनी डोळसपणे पाहावे म्हणजे यातील सत्यता पटेल. मजसारख्या मध्यमवर्गीयाचे हे उद्गार आहेत. वरचा वर्ग ऐषआराम व स्वार्थच फक्त जाणतो. खालचा वर्ग, काही न समजल्यामुळे समर्थपणे ओढणारांचे पाठीमागून जातो. राहता राहिला मध्यम वर्ग, ज्याच्या पुण्याईवर राष्ट्रे जगतात तो हा मध्यम वर्ग. त्याच मध्यमवर्गापैकी मी एक हे बोलत आहे. आम्हीच विचार केला पाहिजे. लहान उद्योग-व्यवसायवाले, सामान्य शेतकरी, सरकारी-बिनसरकारी नोकर, कलावंत व श्रमिक या सर्वांनी यावेळी अगदी जागरुकतेने विचार करायला हवा. पुन्हा एकदा सांगतो, मध्यमवर्गीयांनो जागे व्हा. जे होऊ शकतील त्यांना जागे करा व न्याय, नीती व समृद्धी याकरिता चालू निवडणुकीत अगदी डोळसपणे मतदान करा. ही शेवटची संधी आहे हे मला आवर्जून सांगावयाचे आहे.

**पंडित वि. म. जोशी**
**ज्योतिष विशारद**

# अंदाज

**३० जाने. ते ५ फेब्रु. १९७१**

**मेष** : शरीरप्रकृती चांगली राहील. शनिवार–रविवार मालायोग आहे. धार्मिक कार्याकरता प्रवासयोग येईल. गुरू-चंद्राचा ९।५ योग व शिवाय गुरूची चतुर्थावर दृष्टी. घरात सुखसमृद्धी वाढेल. भावंडांची संपूर्ण मदत मिळेल. अचानक धनलाभ गुरुवार–शुक्रवारी होईल. जरासा हेकट स्वभाव होईल. तो प्रयत्नांनी आवरावा. "मौनं सर्वार्थ साधनम्" हे वाक्य ध्यानात ठेवावे.

विद्याभ्यासात यश येईल. सरकारी कामे सहजसुलभ घडून येतील. संततीचा उत्कर्ष होईल. उद्योगधंदा चांगलाच चालेल. सार्वजनिक कामात नावलौकिक होईल. मित्रांकडून फसवणूक होण्याचा योग आहे. विशेषतः स्त्री मित्रांकडून. मातुल घराण्याकडून भाग्योदयकारक घटनांना मदत होईल. चंद्राचे भ्रमण १२।१।२ या स्थानांतून आहे ते चांगले आहे. मालायोग काहीतरी अचानक शुभ घटना घडवील. शुभ तारखा ३०।३१।१।४।५

**वृषभ** : शरीरस्वास्थ्य जरासे बिघडेल. मधुमेहाचा विकार असणारांना त्रास होईल. धनस्थिती चांगलीच राहील. बुधवारी बुध मकरेत गेल्यावर सरकारी रकमा हातात पडतील. प्रवासाचा योग शनिवार–रविवारी येईल. कौटुंबिक अस्वस्थता जाणवेल. वैराग्याचे विचार मनात येतील. धंद्याची घडी जरा विस्कटेल.

विद्याभ्यासात बुधवारपर्यंत अपयश येईल. परसन्यालिटीला थोडा कमीपणा येईल. संततीला भरभराटीचे दिवस लवकरच येतील. बौद्धिक व्यवसायातील व्यक्तींच्या उद्योगात भरपूर यश मिळेल. हा अनुभव ३२ ते ३६ वयातील व्यक्तींना जास्त येईल. सार्वजनिक कामांत पुढाकार घ्यावा लागेल. चंद्राचे भ्रमण ११।१२।१ या स्थानांतून आहे. सर्व सप्ताह शुभ फलदायक आहे. इंडिकेटची राशी आहे.

**मिथुन** : शरीरप्रकृती बुधवारनंतर थोडीशी नरम होईल. धनस्थिती चांगली राहील. प्रतिष्ठेकरता मंगळवारी खर्च करावा लागेल. भावंडांकडून त्रास होईल. घरात मतभेद होतील. आत्मघातकी विचार मनात येतील. प्रवासात त्रास होईल. प्रवास टाळावा.

विद्याभ्यासात यश येईल. संततीचा उत्कर्ष होईल. बौद्धिक व्यवसायातील व्यक्तींचा प्रगतिपर काल आहे. सरकारी कामात अपयश येईल. पराक्रमाला वाव मिळणार नाही, पत्नीकडून सहकार्य मिळेल. भागीदार अनेक बाजूंनी मदत करतील. सहाव्या

घरातला गुरू दशमावर पाहतो, त्यामुळे प्रतिष्ठा सांभाळली जाईल. चंद्राचे भ्रमण १०।११।१२ या स्थानांतून आहे ते चांगले आहे. शुभ तारखा ३०।३१।४।५

**कर्क :** शरीरप्रकृती चांगली राहील. धनस्थितीला तडा जाईल. मामाकडे अगर सासुरवाडीला शुभकार्याकरता जाण्याचा योग येईल. घरात वृद्ध माणसांपैकी कोणीतरी आजारी पडेल. भावंडांकडून सर्व तऱ्हेची मदत होईल. वडील मेव्हणा अचानक आजारी पडेल.

विद्याभ्यासात चांगलीच प्रगती होईल. मेडिकल अगर मेकॅनिकल कोर्स करणारे विद्यार्थी मानसन्मान मिळवतील. शनिवार–रविवारी हा योग येईल. जमिनीचा व्यवसाय करणाऱ्या एजंट लोकांना दिवस चांगले आहेत. मित्रांकडून सर्व प्रकारची मदत होईल. चंद्राचे भ्रमण ९।१०।११ या स्थानांतून आहे ते फारच चांगले आहे. सर्व सप्ताह शुभ फलदायी आहे.

**सिंह :** शरीरप्रकृती चांगली राहील. डोक्यात तत्त्वज्ञानाचे विचार गर्दी करतील. धाडसाच्या केलेल्या मोठ्या मोठ्या प्रयत्नांत यश येईल. चतुर्थातील गुरु–मंगळ योगगृह सौख्य वाढवील व सर्व बाजूंनी परिस्थितीत सुधारणा होईल. मानमान्यता, पैसा सर्व मनाजोगे मिळेल. हा अनुभव २८ ते ३२ वयातील व्यक्तींना येईल.

विद्याभ्यासात यश येईल. पुस्तके शास्त्रीय विषयावर लिहिली जातील. प्रेमाच्या भानगडीत पुरुष माणसांकडून विचारणा केली जाईल. पत्नीमुळे भाग्योदय होईल. फॅन्सी वस्तूंच्या व्यापाऱ्यांना अमाप पैसा मिळण्याचा शुभयोग आहे. शनिवार–रविवारी मनःस्वास्थ्य बिघडेल.

चंद्राचे भ्रमण ८।९।१० या स्थानांतून आहे ते तितकेसे चांगले नाही. शुभ तारखा १ ते ५.

**कन्या :** शरीरप्रकृती चांगलीच राहील. धनस्थितीत चांगलीच सुधारणा होईल. येणारे पैसे विनासायास घरपोच येतील. पराक्रम हातून घडेल. भावंडाकडून सर्व प्रकारची मदत होईल. घरात काहीतरी शुभ समारंभ साजरा होईल. शिक्षक, प्रकाशक, लेखक या लोकांना दिवस प्रगतीपर आहेत. सरकारचे संपूर्ण सहकार्य मिळेल.

विद्याभ्यासात संपूर्ण माघार घ्यावी लागेल. परीक्षेत अपयश येईल. व्ययेश पंचमात व पंचमेष अष्टमात यामुळे संततीपासून त्रासदायक परिस्थिती निर्माण होईल. फौजदारी खटल्यात सापडण्याचा योग आहे. त्यातून दशमेश बुध सोडविल. चंद्राचे भ्रमण ७।८।९ या स्थानातून आहे ते साधारण आहे. शुभ तारखा ३०।३१।३।४।५.

**तूळ :** शरीरप्रकृती चांगली राहील. गुरु-मंगळ धनस्थानात आहेत. हा कारक

अधिपतीयोग आहे. धनस्थितीत नेत्रदीपक वाढ होईल. अपेक्षिलेले सर्व धन विनासा यास हातात पडेल. कौटुंबीक सुख लाभेल. शनी रवीवर पूर्ण पाहतो व तो चर राशीतआहे. मित्रांकडून नसत्या भानगडी निर्माण केल्या जातील.

विद्याभ्यासात संपूर्ण माघार घ्यावी लागेल. संततीकडून थोडाफार त्रासच दिला जाईल. पत्नी व भागिदार नीट वागणार नाहीत. मंगळवार बुधवार मानसिक यातना वाढतील. पोझिशनला कमीपणा येतो की काय अशी भीति निर्माण होईल. चतुर्थातील रवी सर्व अडचणीतून पार पाडील. चंद्राचे भ्रमण ६।७।८ या स्थानातून आहे ते चांगले आहे. शुभ तारखा ३०।३१।३।४।५.

**वृश्चिक :** शरीरप्रकृती चांगल राहिली. धनस्थिती अत्यंत समाधानकारक राहील. शनवार-रविवार कुंडलीला मालायोग झालेला आहे. लग्नापासून सहाव्या घरापर्यंत सर्व ग्रह आहेत. साधुसंतांना आपले आध्यात्मिक तेज दाखविण्याला काळ अत्यंत चांगला आहे. संसारी माणसाला संपत्ती व कीर्ती माळ घालतील. इंडिकेटची राशी आहे.

विद्याभ्यासात नेत्रदीपक प्रगती होईल. संततीचा उत्कर्ष होईल. बुधवारनंतर सरकारी कामाकरता प्रवास योग येईल. त्यात सर्वांची मदत होईल. हातात घेतलेल्या प्रत्येक कामात यश येईल. शत्रूनाश होईल. चंद्राचे भ्रमण ५।६।७ या स्थानातून आहे. ते फार चांगले आहे. सर्व सप्ताह शुभफलदायी आहे.

**धन :** शरीरप्रकृती चांगलीच राहील. गुरुवार-शुक्रवार मातुल घराण्याच्या ओळखीनी लग्नाची मागणी येईल. लग्नी बुध-शुक्र आहेत. ते शुभफलदायी आहेत. भावंडाकडून मानसिक यातना देणाऱ्या घटना घडतील. घरात थोडासा मतभेद होईल. आध्यात्मिक विचार मनात दृढमूल होतील. प्रवासयोग टाळावा. धनस्थिती सुधारेल.

विद्याभ्यासात माघार घ्यावी लागेल. मशिनरीचे अभ्यासक्रम करणारांना जास्त त्रास होईल. संतती नीट वागणार नाही. भागीदारांकडून सर्व बाबतीत मदत होईल. अचानक धनलाभाचा योग गुरुवार-शुक्रवारी आहे. सरकारी कामात निश्चित यशप्राप्ती होईल. मानसन्मान वाढेल. चित्रकलाकारांना प्रगतीपर दिवस आहेत. चंद्राचे भ्रमण ४।५।६ या स्थानातून आहे. ते शुभफलदायी आहे. शुभतारखा ३०।३१।४।५.

**मकर :** शरीरप्रकृती चांगली राहील. पैशाची अडचण वाढेल. भावंडाकडून व भागीदारांकडून सर्व प्रकारची मदत शनवार-रवीवारी होईल. घरात थोडासा मतभेद होईल. बुधवारनंतर भाग्येश व शष्ठेश बुध लग्नी येत आहे. सर्वबाजूंनी शुभ-

घटना घडतील. राहण्याच्या जागेचा प्रश्न मनासारखा सुटेल. सरकारी कामात पूर्ण यशप्राप्ती होईल.

विद्याभ्यासात थोडी माघार घ्यावी लागेल. वैद्यकशास्त्राचा अभ्यास करणारांना जास्त त्रास होईल. पुरुषांकडून मागणी घातली जाण्याचा योग आहे. गुरुवार-शुक्रवार याबाबतीत चांगले. गायक, नट, चित्रकार यांना प्रगतीपर दिवस आहेत. जनतेकडून अमाप कौतुक केले जाईल.

चंद्राचे भ्रमण ३।४।५ या घरातून आहे. ते फारच चांगले आहे. सर्व सप्ताह शुभ-फलदायी आहे.

**कुंभ :** शरीरप्रकृती चांगली राहील. स्वभावात थोडासा आग्रहीपणा येईल. तडजोड करावी. धनस्थिती सुधारेल. भावंडाकडून मदत होण्याची शक्यता फारच कमी. प्रवासयोग येईल. त्यात यश येईल. घराचे प्रश्न समाधानकारक सुटतील. शनिवार रविवार अनपेक्षीत धनलाभ होईल. वृद्ध माणसांना हा योग जास्त आहे.

विद्याभ्यासात यशप्राप्ती होईल. संततीचा उत्कर्ष होईल. त्यांची वागणूक बुधवारनंतर त्रासदायक होईल. पत्नी जरा तुटकपणानी वागेल. भागीदार नीट वागणार नाही. दशमातील गुरू मंगळ मान मान्यता वाढवतील. बौद्धिक धंद्यात संपूर्ण यश येईल. महत्त्वाकांक्षा सफल होतील.

चंद्राचे भ्रमण २।३।४ या स्थानातून आहे. ते चांगले आहे. शुभ तारखा ३०।३१।३।४।५

**मीन :** शरीरप्रकृती चांगली राहील. धनस्थितीत मनासारखी घटना घडेल. प्रवासयोग येईल. प्रवासात भाग्योदय होणाऱ्या घटना घडतील. पराक्रमाला चांगलाच मोका लाभेल. घरात काहीतरी शुभसमारंभ गुरुवार शुक्रवारी घडून येईल. भाग्य स्थानापासून धनस्थानापर्यंत माला योग आहे. उदय गोलार्धात आहे. मोठेपणा प्राप्त होईल.

विद्याभ्यासात संपूर्ण यश मिळेल. संततीचा उत्कर्ष सर्व बाजूंनी होईल. बौद्धिक व्यवसाय करणाराला फारच प्रगतीकारक दिवस जातील. सार्वजनीक कामात यश मिळणे कठीण जाईल. गृहसौख्य वाढेल. चैनीच्या वस्तू खरेदी होतील. चंद्राचे भ्रमण १।२।३ या घरातून आहे. ते फारच चांगले आहे. सबंध सप्ताह शुभफलदायक आहे.

□ □ □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर**

MANOOS (Biweekly) : 40 Paise : Regd. No. M–H 649




“ आपल्याला बस स्टॉपवर बराच वेळ थांबावं लागलं होतं ना... ”